विकसन"ील व अविकसीत दे"ांमध्ये टाकाऊ पदार्थांचा प्र"न उत्तरोत्तर वाढतो आहे असे दिसते. जसज"ी लोकसंख्येत वाढ होते तसत"ी वस्तुंची उपभोग्यता वाढते. ही उपभोग्यता कचऱ्याच्या प्रदूषणास कारण ठरते.

प्रत्येक दे"ातील नागरी भागात नागरीकरणामुळे कचरा प्रदूषण ही एक गंभीर पर्यावरणीय समस्या निर्माण झालेली आहे. वाढत्या नागरीकरणामुळे तर कचऱ्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. नागरी भागात प्रामूख्याने घरातून टाकून दिलेले पदार्थ व कारखान्यातून टाकून दिलेले पदार्थ यांचा कचऱ्यामध्ये समावे"ा आढळतो. कचरा कुजल्यामुळे दुर्गंधी निर्माण होते, तसेच कचऱ्यामुळे जीवजंतुचा प्रसार, रोगराई,अनारोग्य निर्माण होते. आज जगातील बहुतेक शहरांमध्ये कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याने कचरा प्रद्षण मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले आढळते.उदा.महाराष्ट्रातील मुंबई ११,६४५, पुण ०२,७२४ मे.टन कचरा या दोन महानगरांमध्ये दररोज निर्माण होतो.[३१]नागरी भागात मोठ्या प्रमाणात केरकचऱ्याचे उत्पादन होते. त्यामुळे कचरा प्रदूषणही मोठ्या प्रमाणात होते. विकसन"ील दे"ांच्या शहरी भागाच्या तुलनेने विकसीत दे"ांच्या शहरी भागात लोकांचे राहणीमान उच्च प्रतीचे असल्याकारणाने केरकचऱ्याच्या उत्पादनाचे दर ३ ते ४ पट अधिक आहे. परिणामी कचरा प्रदूषणाचे प्रमाणही साहजिकच जवळपास ३ ते ४ पट अधिक आढळते.

१.१५ कचरा व्यवस्थापन

१.१५.१ अर्थ :

घन कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य हाताळणीद्वारे त्यापासून होणाऱ्या अपायांना प्रतिबंध करणे, पुननिर्मितीद्वारे उरलेल्या भागाची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे, या सर्व गोष्टींचा समावे"ा व्यवस्थापनामध्ये होतो. घरगुती, व्यावसायिक, उद्योगधंद्या"ी संबंधित, कृषी आणि धोकादायक वैद्यकीय कचरा, मानवाद्वारे उत्सर्जित केल्या जाणाऱ्या गोष्टी यांसारख्या गोष्टींचा

समावे"ा कचऱ्यामध्ये होतो. मानवाद्वारे केल्या जाणाऱ्या अनेक गंभीर कृतींमधून निर्माण होणाऱ्या टाकाऊ गोष्टी गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे म्हणजे कचरा व्यवस्थापन होय. उदाहरणार्थ, एखादी वस्तू खरेदी केल्यानंतर तिचे वरचे प्लॅस्टिकचे काढून टाकलेले कव्हर किंवा पॅकिंग म्हणजे कचरा. अ"ाा टाकाऊ गोष्टींमुळे पर्यावरणाला हानी पोचते. अनेक रोगांच्या प्रसारास हा कचरा कारणीभूत ठरतो. सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या दे"ाांमध्ये आरोग्य रक्षणासाठी घ्यावयाची खबरदारी योग्य प्रकारे न घेतल्याने साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे दाखले इतिहासातही आढळतात. वैयक्तिक आरोग्याबरोबरच पर्यावरणावरही या गोष्टींचे गंभीर परिणाम होतात. टाकाऊतून टिकाऊ पदार्थाची निर्मिती, पुनर्वापर, पर्यावरण पूरक गोष्टींची निर्मिती अ"ाा सकारात्मक, योग्य पद्धतीने केलेले कचरा व्यवस्थापन हे हरितक्रांतीला उपकार ठरणारे महत्वाचे पाऊल ठरले. भारत सरकारचा 'नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०००' अन्वये कचरा जाळणे हा गुन्हा आह.[३२] कारण कचरा जाळल्याने हवेत प्रदूषण होऊन धोकादायक वायू बाहेर पडतात. प्लास्टीक जाळल्याने कॅन्सरसारखे विकार होऊ शकतात.

शेतात उत्पादन वाढीसाठी शेतकरी रासायनीक खतांचा व कीटकना"ाकांचा मोठ्या प्रमाणावर वापर करीत आहेत. त्यामुळे शेतीची, लोकांच्या प्रवृत्तीची व पर्यायाने पर्यावरणाची खूप मोठी हानी होत आहे. त्यामुळे लोकांना सेंद्रीय उत्पादनाचे महत्त्व समजलेले आहे. शेतकऱ्यांनी या नवीन सुधारीत सेंद्रीय शेतीपद्धतीच्या तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी. त्यासाठी कृषी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा.

१.१५.२ ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन [३३]:

ओला कचरा म्हणजे स्वयंपाकघरातील पालेभाज्यांची देठे साली, शहाळे नारळाची टरफले, वापरलेल्या चहापत्तीचा चोथा, उष्टे ि"ाळेपाके, केसांचा गुंता, कापलेली नखे, झाडे वनस्पतींचा पालापाचोळा, फांद्या, लाकडी तुकडे इ. सर्व ओल्या कचऱ्यात येत असते. त्यापासून उत्कृष्ट दाणेदार खत तयार करता येते.

अ) कंपाष्ट खत :

कुजणारा कचरा खड्ड्यामध्ये दररोज टाकत जावा. तो खड्डा ६ ते ७ इंच भरला म्हणजे त्यावर शेणाचा व मातीचा एक थर देणे. कारण मातीमध्ये घाण वास नष्ट करायचा गुणधर्म असतो. त्यानंतर तो खड्डा कचऱ्याने भरावा. त्यावर शेण व मातीचा एक थर द्यावा. त्यावर दररोज पाणी ि"ांपडत जावे. ६ महिन्यांनंतर तो खड्डा उपसण्यात यावा. असे ३ ते ४ खड्डे खोदून ठेवावेत.

व्हर्मीकल्चर ड्रम पीट पद्धत–ड्रम पीट सुरू करण्याची पद्धत :

सर्व प्रथम ड्रममध्ये खालचे बाजूस ३ इंच बारीक विटांचे तुकडे पसरणे. त्यावर १ इंच जाड वाळूचा थर देणे. त्याचेवर १० किलो कल्चरचा म्हणजेच कुजलेल्या शेणखताचा थर पसरणे. त्यावर २५ जिवंत गांडूळे सोडणे, त्यानंतर ड्रम भरून हिरवा पालापाचोळा भरणे. नंतर गाईचे ताजे शेण पाण्यात कालवून, पातळसर करून हिरव्या पाल्यापाचोळ्यावर ि"ांपडणे. अ"ा प्रकारे ड्रम पीट सुरू करावे. सुरूवातीस पहिले १० दिवस फक्त एकदा सकाळी १ लिटर पाणी झारीने हळूवार टाकणे अथवा हाताने ि"ांपडणे. १० दिवसांनंतर हिरवा पालापाचोळा संपूर्ण कुजून

काळा पडल्यावर साधारण दीड जे दोन इंच सेंद्रिय कचऱ्याचा म्हणजेच स्वयंपाक घरातील कचऱ्याचा थर पसरणे व त्याचेवर १ लिटर पाणी झारीने टाकावे किंवा हाताने ि"ंपडावे.

ब) गांडूळखत :

कंपोस्ट खतासाठी जसा खड्डा करतात तसा गांडूळ खतासाठीही वापरता येतो. फक्त गांडूळांना श्वसनासाठी फिरता आले पाहिजे व त्या खड्ड्यासभोवताली सच्छिद्र असे बारीक जाळी लावलेली असावी. आद्रता टिकून राहण्यासाठी दररोज पाण्याचा ि"ाडकाव करावा लागतो. एक स्क्वेअर फुटाला १०० ग्रॅम गांडूळे सोडावीत. तसेच सांडपाण्यासाठी शोषखड्डे किंवा शोषनाली तयार करावीत. दमट व उबदार जमिनीत गांडूळांची वाढ जोमाने होत असते. गांडूळे माती खातात व शरीराबाहेर दाणेदार सुपीक खत टाकतात. त्यात नायट्रोजन दुप्पट व फॉस्फरस ७ पट तर पोटॅ"ियम ११ पट असते. गांडूळे जमिनीची सखोल म"ागत करीत असतात. सतत साफसफाई करीत असतात. गांडूळे शेतकऱ्यांचे खरे मित्र आहेत. या खतामुळे जमीन सुपीक बनते. गांडूळांनी तयार केलेल्या शेतात पिकविलेल्या अन्नाचा कसही अधिक असतो. या जीवनसत्वयुक्त अन्नामुळे चांगले पोषण होत असते. गाडूळे म्हणजे एक प्रकारचे आद्य शेतकरी आहेत. कारण गांडूळांपासून उत्तम दर्जाचे सेंद्रिय कचऱ्यापासून पर्यावरणपूरक असे उत्तम जैविक खत तयार होत असते.

क) जैविक कल्चरयुक्त खत आणि ई.एम. सोल्यूभान युक्त खत :

कृषी विद्यापीठांनी तयार केलेले जैविक कल्चर आणि ई.एम.सोल्य"ान (Effective Micro-Organism Solution) हे ओल्या कचऱ्यात थोडेसे टाकावे. या द्रावणातील सूक्ष्म जीवाणू ओला

कचरा खाऊन टाकतात व उत्कृष्ट खत निर्माण करतात. हे सोल्यू"ान किंवा जैविक कल्चर शहरातील निरनिराळ्या संस्थांमधून विकत मिळत असते.

ड) वीज किंवा बायोगॅस :

ओल्या कचऱ्यापासून वि"ाष्ट यंत्रातून वीज व बायोगॅस तयार करता येते. अ"ाप्रकारे पर्यावरण वाचविण्यासाठी कमी खर्चाची जैव शेती पारंपारिक पद्धतीने करता येते.

१.१५.3 कोरड्या कचऱ्याचे व्यवस्थापन[३४] :

सर्वात धोकादायक प्लॅस्टिकच्या पि"ाव्या, बाटल्या, तुकडे आहेत. कारण प्लॅस्टिकचे विघटन होत नाही. थर्माकोल, रबर, टायर, ट्यूब, रबरी मोजे, औषधी बाटल्या, काचा, फुटक्या कपब"ाा, इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक वस्तुंचे तुकडे, संगणकाचे तुकडे असा कचरा तारा, खिळे, डबे, पत्रा, ब्लेड, सूया यासारख्या लोखंडी सामानाचे तुकडे आणि औद्यागिक कचरा, कागद व कपडयांचे तुकडे, चिंध्या, गुटख्याचे पाकीटे, सिगरेटची पाकीटे व थोटूके व खोके तसेच वैद्यकीय कोरडा कचरा हा कचरा काही अज्ञानी लोक जाळण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे प्रदूषण होत असते. कोरडया कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी **आर-५** या पद्धतीचा वापर करतात.

१) Refuse (वापरू नका) :- प्लॅस्टिक ही एक अविघटनकारी वस्तू आहे. तेव्हा त्या वापरू नयेत. कायद्यानेही बंधने घातलेली आहेत. त्यामुळे उत्पादकांवर बंधने आलेली आहेत.

२) Reduce (वापर कमी करा) :- वीज व इंधनाचा वापर कमी केल्याने उर्जेची बचत होत असते.

३) Reuse (पुनर्वापर करा) :- अविघटनक्षम कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी काही वस्तू फेकून न देता दुरूस्त करून पुन्हा वापराव्यात. किंवा कारखान्यातून त्यांच्या नवीन वस्तू तयार करून बाजारात नवीन म्हणून विकायला पाठवणे.

४) Repairs (दुरूस्त करा) :- वस्तू तुटल्यावर फेकून न देता त्याची दुरूस्ती करून पुन्हा वापरता येतात. जुने फर्निचर दुरूस्त करून पुन्हा वापरावे.

५) Recycle (पुनःश्चक्रीकरण) :- एखादी वस्तू वापरून ती फेकून न देता तिच्यावर प्रक्रिया करून पुन्हा वापरण्यालायक तयार करता येणे. उदा. कागदापासून पुठ्ठा, हातकागद फाईल्स तयार करता येतात. डांबरात लोखंड, प्लॅस्टिक व रबर एकत्र करून वितळून त्यापासून यांत्रिक भाग, वापरायच्या वस्तू तयार करता येतात. रस्ते तयार करता येतात. पाणी व मृदा संवर्धन, स्वच्छ तंत्रज्ञान आणि कचरा व्यवस्थापन यासाठी अनेक सरकारी धोरणे व योजना अस्तित्वात आहेत. सुरक्षित व पुरेसे स्वच्छ पाणी आणि स्वच्छता व्यवस्था, उत्तम ि"ाक्षण आणि आरोग्य व्यवस्था, मृदा, वने व जैवविविधतेसारख्या नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर या सर्व गोष्टी साध्य करण्यासाठी सर्व नागरी आणि सामाजिक संस्थांनी या उपक्रमात मनापासून लक्ष घालणे फार महत्वाचे आहे.पर्यावरणीय घटकांचे मूल्यमापन केंद्रीय प्रदूषण मंडळ व राज्य प्रदूषण मंडळामार्फत केले जात असते. महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांनी पर्यावरणविषयक अहवाल बाळगणे बंधनकारक केलेले आहे. अ"ाप्रकारे

कचऱ्याचे व्यवस्थापन हे एक अत्यंत महत्वाचे कार्य आहे. त्यामध्ये महानगरपालिका आणि नगरपालिका यांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते.

१.१५.४ कचरा व्यवस्थापनाशी संबंधित घटक[३५] :

१) उत्सर्जन. २) कचऱ्याचे प्रमाण कमी करणे.

३) कचरा उचलणे/काढून टाकणे. ४) कचऱ्याची वाहतूक.

५) कचऱ्यावर केली जाणारी प्रक्रिया. ६) पुननिर्मिती आणि पुनर्वापर.

७) कचरा गोळा करणे, साठवणूक, वाहतूक. ८) प्रक्रिया.

९) पर्यावरणावर होणारा परिणाम. १०) आर्थिक बाबी.

११) धोरणे व नियम. १२) ि"ाक्षण व प्रि"ाक्षण.

१३) कृती आराखडा/योजना व अंमलबजावणी.

१.१५.५ कचरा व्यवस्थापनाच्या पद्धती[३६]:

१.१५.५.१ खड्डयांमध्ये कचरा टाकणे : बऱ्याच दे"ाांमध्ये, जमिनीवर खोदलेल्या खड्डयांमध्ये कचरा टाकून देणे ही पद्धत प्रचलित आहे. पडीक जमीन, वापर नसलेल्या खाणी अ"ाा ठिकाणी कचरा टाकला जातो. अ"ाा ठिकाणाला कचरा डेपोचे रूप येते. मात्र योग्य जागी, योग्य व्यवस्थापन करून उभारलेला कचरा डेपो हा आरोग्यदायी आणि तुलनेने कमी खर्चिक असतो अन्यथा, कचरा साठविण्याच्या अ"ाा जागेमुळे मिथेन आणि कार्बन डायऑक्साईड या अति"ाय घातक वायूंचे उत्सर्जन होते. कचऱ्याच्या आद"ा व्यवस्थापन पद्धतीमध्ये या वायूंच्या ज्वलनाद्वारे वीजनिर्मिती केली जाते.

१.१५.५.२ ज्वलन : कचरा जाळून त्याद्वारे निर्माण होणाऱ्या वायूंचा पुर्नवापर करणे याचा अंतर्भाव या पद्धतीमध्ये होतो. घन कचरा तसेच दूषित पाणी यापासून वापरण्यायोग्य

घटकनिर्मितीसाठी ज्वलनाचा उपयोग होतो. असे ज्वलन करणारी केंद्रे कचऱ्याचे रूपांतर उष्णता, वायू, राख किंवा वाफ या वापरण्यायोग्य स्वरूपात करतात. लघुउद्योग किंवा मोठे कारखाने ही पद्धत वापरतात. जीव वैद्यकीय कचऱ्याच्या व्यवस्थापनामध्ये ही पद्धत अधिक परिणामकारक ठरते. परंतु, उत्सर्जित केल्या जाणाऱ्या प्रदूषणकारक वायूंमुळे ही पद्धत वादग्रस्त आहे. जपानसारख्या दे"ाांत, जिथे मुबलक प्रमाणात जमिनीची उपलब्धता नाही, तिथे ही पद्धत सर्रास वापरली जाते. कारण जमिनीवर कचरा साठविण्याएवढी जागा ज्वलनकेंद्र उभारणीला आव"यक नसते. तरीही या प्रकल्पांद्वारे उत्सर्जित होणारे काही रासायनिक घटक पर्यावरणाच्या हानीला कारणीभूत ठरतात.

१.१५.५.३ पुननिर्मिती/पुनःश्चक्रीकरणः कचऱ्यातील टाकाऊ पदार्थांपासून, घटकांपासून नवीन उत्पादन तयार करणे म्हणजे पुर्ननिर्मिती. वि"ाष्ट वाहनांद्वारे, तसेच साठा करण्यासाठी असलेल्या मोठया कंटेनरद्वारे हे टाकाऊ पदार्थ गोळा केले जातात. त्यानंतर त्यांचे कागद प्लॅस्टिक व धातू यांनुसार वर्गीकरण केले जाते. तर काही ठिकाणी पुर्ननिमितीक्षम कचरा एकत्र साठविला जातो व नंतर तो वर्गीकृत होतो. या पद्धतीला 'सिंगल स्ट्रीम रिसायकलिंग' असे म्हणतात. तांब्याच्या तारा, हवाबंद डबे, काचेचे डबे, बाटल्या, वृत्तपत्रे, मासिके, स्टीलचा वापर असणाऱ्या सजावटीच्या वस्तू, भांडी या सर्व गोष्टींपासून वापरण्यायोग्य नवीन वस्तू निर्माण करता येऊ शकतात. कचऱ्यापासून पुननिर्माणाचे प्रत्येक शहराचे व दे"ाचे धोरण वेगळे असते. प्रक्रिया केलेल्या मालाची किंमत ही यानुसार ठरते व बदलती असते.

१.१५.५.४ टिकून राहण्याची क्षमता : मोठमोठे उद्योगसमूह पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी उत्सर्जित होणारा घन कचरा प्रक्रिया करून पुन्हा वापरण्यायोग्य रूपात कसा रूपांतरित होईल

या दि"ोने प्रयत्न"ील असतात. धातू, काच, प्लॅस्टिक, कागद, कार्डबोर्ड या सर्व टाकाऊ गोष्टींवर प्रक्रिया करून त्या अधिकाधिक पर्यावरणपूरक रूपात वापरता येतील याद्वारे हे उद्योग उद्योगजगतातील प्रतिष्ठेचे ISO १४००१ मानांकन मिळवण्यासाठी प्रयत्न"ील असतात.

१.१५.५.५ स्त्रोतांचा पुनर्लाभ : वि"िाष्ट हेतूने, प्रयत्नपूर्वक, उर्जेमध्ये केली जाणारी टाकाऊ गोष्टींपासून पुनर्निर्मिती ही पर्यावरणदृष्टया महत्वाची तर असतेच, ि"िवाय कमी खर्चिक देखील असते. यासाठी कमी जागा लागते. कचरा व्यवस्थापनाला असणारी ही एक पर्यायी अ"ी जीवनचक्र प्रणाली म्हणता येईल. यांमध्ये निसर्गात असणाऱ्या स्त्रोतांचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयत्न केला जातो. काही अभ्यासांद्वारे हे सिद्ध झाले आहे की, पुननिर्मिती, पुनर्वापराबरोबरच सेंद्रिय पदार्थांपासून मिळालेले घटक, खते हे पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने उपकारक आहेत.

१.१५.५.६ ऊर्जेचा पुनर्लाभ : या पद्धतीमध्ये पुनर्निर्मिती करता येणार नाही अ"ा घटकांचे रूपांतर ज्वलनाद्वारे उष्णता, विद्युत यांमध्ये केले जाते. मर्यादित प्रमाणावर ऑक्सिजनच्या पुरवठयाद्वारे उच्च तापमानाला टाकाऊ घटकांवर ही प्रक्रिया करण्यात येते. याद्वारे कचऱ्याचे रूपांतर घन, द्रव किंवा वायू पुन्हा वापरता येऊ शकतील अ"ा पदार्थांमध्ये करण्यात येते. हे पदार्थ पुन्हा रासायनिक क्षेत्रामध्ये वापरले जातात. तसेच उष्णता, वीजनिर्मितीसाठी वायूचा उपयोग केला जातो.

१.१५.५.७ जैविक पुनर्प्रक्रिया: निसर्गातील सेंद्रिय कचरा जसे वाया गेलेले अन्न, पालापाचोळा, कागद यांपासून खतनिर्मिती हाऊ शकते. शेतीसाठी उपयुक्त असणारे खत, या प्रक्रियेद्वारे मिळणाऱ्या मिथेन वायूचा वापर उष्णता वीजनिर्मितीसाठी करणे यामुळे ही प्रक्रिया महत्वाची

ठरते. सेंद्रिय घटकाचे विघटन नैसर्गिक पद्धतीने पुन्हा वापरण्यायोग्य रूपामध्ये करणे या गोष्टीवर ही पद्धती भर देते.

१.१५.५.८ कचऱ्याचे प्रमाण कमी करणे : कचऱ्याचे प्रमाण कमीत कमी असावे यासाठी काय उपाययोजना करता येतील याचा विचार होणे सध्याच्या घडीला आव"यक आहे. प्लॅस्टिकऐवजी कापडी, कागदी पि"ाव्या वापरणे, सतत नवीन गोष्टींच्या मागे लागण्यापेक्षा आहे त्या वस्तूंचे जतन, योग्य प्रकारे वापर करण्याची जागरूक जाणीव, अन्न, पाण्याचा अपव्यय न करणे, पर्यावरण पूरक उत्पादनांची निर्मिती करणे याद्वारे आपण पर्यावरण रक्षणासाठी मदत करू शकतो. एक सुजाण, जबाबदार नागरिक म्हणून सद्यस्थितीत प्रत्येकाने हे भान बाळगणे गरजेचे आहे.

१.१६ सारांश

संशोधकाने **'घनकचरा पुनःश्चक्रीकरण : एक अर्थशास्त्रीय विश्लेषण'' (पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)** हा विषय संशोधनासाठी निवडला. घनकचऱ्याचे विपरीत परिणाम पर्यावरणावर होत असतात. पर्यावरण हा सध्याच्या आधुनिक काळातील ज्वलंत विषय आहे. पर्यावरणाचे रक्षण केले तरच मनुष्य व इतर प्राण्यांचे, पक्ष्यांचे भवितव्य या पृथ्वीवर सुखकारक होईल. म्हणुन संशोधकाने पर्यावरण संकल्पना, पर्यावरणाचे प्रकार, पर्यावरणीय प्रदूषण, भु–प्रदुषण आणि भु–प्रदूषणामध्ये कचरा प्रदुषण कशी मोठी समस्या आहे. याचा थोडक्यात आढावा पहिल्या प्रकरणात घेतला. घनकचऱ्याचे प्रदुषण दुर करायचे असेल तर घनकचऱ्याचे व्यवस्थापन योग्य रीतीने झाले पाहिजे. त्यासाठी घनकचऱ्याचा पुर्नवापर, घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण केले गेले पाहिजे.

संदर्भ-ग्रंथसुची

१. Benny Joseph (2009) 'Enviromental Studies'MCgraw Hill publishing Company, New Delhi 8

२. चौधरी शंकर (२००२) ''पर्यावरण व आर्थिक क्रिया''हिमालया पब्लीि"ंग हाऊस मुबंई पान क्र.२,३

३. अहिरराव वा.र.(१९९२)'पर्यावरण विज्ञान'निराली प्रका"ान पुणे पान क्र.१६

४. किर्दात एस.बी,पाटिल पी.एन,ननवरे एस्.एन,(२००६) 'पर्यावरणीय जाणीव जागृती' निराली प्रका"ान पुणे पान क्र.३.१३

५. वराट तु.म. (२००४) 'पर्यावरण"ाास्त्र–एक अभ्यास' रेणूका प्रका"ान, औरंगाबाद पान क्र.६

६. अहिरराव वा. र.(१९९२) Opcit पान क्र.१३

७. Ibid पान क्र. १३,१४

८. Santra S.C (2001) 'Environmental Science' New Central book Agency Kolkata Page No.4,5

९. खैरनार डी.एन. (२००६) ''पर्यावरणीय जाणीव–जागृती'' वर्षा प्रका"ान पुणे पान क्र .१.७

१०. *Eddy, Matthew Daniel (2008)* The Language of Mineralogy: John Walker, Chemistry and the Edinburgh Medical School 1750-1800 sited on https://en.wikipedia.org/wiki/Environmental_science#cite_ref-1 accessed on 11 April 2016 at 11.00 a.m

११. आठवले आ.स, बैरागी क.पि.(२००८) 'पर्यावरणीय सतर्कता' सक्सेस पब्लीके"ान पुण पान क्र. १.३

१२. चौधरी शंकर (२००२) पान क्र. १

१३. Santra S.C. (२००१) opcit पान क्र. ७६४, ७६५

१४. Thakur Kailash(2005) 'Environmental Protectrion Law and Policy in India' Deep and Deep Publication New Delhi Page No.423

१५. Ibid Page No.428,429

१६. Thakur Kailash (2005) Opcit Page No.430

१७. पाटिल य"ावंतराव (२००९) 'पर्यावरण अभ्यास' अक्षरलेण प्रका"ान, सोलापुर पान क्र. १५६,१५७

१८. Ibid पान क्र.१३, १४

१९. अहिरराव वा. र. (१९९२) Opcit पान क्र. ३१७

२०. Khan Y.S.(2006)'Fundamental of Environmental Studies' Akshrlena prakashan Solapur Page No. 266

२१. गंगाधर कायंदेपाटिल (२००५) 'व्यावसायिक पर्यावरण' चैतन्य पब्लीके"ान्स नाि"ाक पान क्र. ३.५५

२२. चौधरी प्रफुल्ल (२०१२)'स्वच्छतेतुन पर्यावरण' सायन पब्लीके"ान्स पुणे पान क्र. ६६

२३. Sinha A.K, Shrivastava pankaj 'Earth Resource and Enviromental Isues' ABD Publishers Jaipur Page No. 27

२४. Thakur Kailash (2005)Opcit Page No.60

२५. Khan Y.S.(2006) Opcit Page No.283

२६. रचना भोला यामिनी(२००५) 'प्रदूषण समस्या तथा निवारण' आखिल भारती प्रका"ान, दिल्ली पान क्र. ९, १०

२७. Shafi S.M.(2005) 'Environmental Pollution' Atlantic publishers Delhi Page No. 11

२८. Mishra S.P.(2006) 'Environmental Pollution' Avishkar publishers Jaipur Page No.35 & 37,38

२९. पवार कि"ाोर (२००४) ''Environmental Awareness"निराली प्रका"ान पुणे पान क्र. ५.६२

३०. अहिरराव वा. र. (१९९२) Opcit पान क्र.२६.३

३१. Sunstainable Solid Waste Management in India; Municipal Solid Waste Generation in India sited on http://swmindia.blogspot.in/2011

३२. Ministry of Environment and Forests Notification (1999) New delhi sighted on Santra S.C.(2001) Environmental Science New Central Book Agency kolkata Page No.1057 tO 1066

३३. चौधरी प्रफुल्ल(२०१२) Opcit पान क्र. ७७, ७८

३४. Ibid Page No.79, 80

३५. खेडेकर बी.डी., गिते टी.जी.(२०१४) औदयोगिक अर्थ"ाास्त्रीय पर्यावरण सक्सेस पब्लीके"ान्स पुणे पान क्र. ४.१७

३६. Ibid Page No.4.18, 4.19

प्रकरण–दोन

संशोधनाचा आराखडा

२.१	संशोधन विषयाची ओळख
२.२	संशोधन विषयाचे महत्त्व
२.३	संशोधन विषयाची व्याप्ती
२.४	संशोधन समस्या
२.५	संशोधनाची उद्दीष्ट्ये
२.६	संशोधनाची गृहीतकृत्ये
२.७	संशोधनाच्या मर्यादा
२.८	संशोधन पद्धती
२.९	सारांश

प्रकरण दोन
संशोधनाचा आराखडा

२.१ संशोधन विषयाची ओळख

जमीन किंवा भूमी निसर्गाने मानवाला दिलेली मोफत/विनामूल्य देणगी आहे. तथापि या देणगीचा मुक्त व अविवेकी पद्धतीने वापर केला जात असल्यामुळे भूमीप्रदूषण किंवा जमीन प्रदूषण मोठ्या प्रमाणात आढळून येते.

वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जंगलातील वृक्षांची मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे. त्यामुळे मानवी हितासाठी आणि मानवांना आपले अस्तित्व कायम ठेवण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा अविवेकी व सतत उपयोग केला जात असल्याने वनसंपत्तीचा ना"ा मोठ्या प्रमाणात होत आहे. तथापि वनसंपत्तीचे संवर्धन करण्यास अपय"ा येत आहे. औद्योगीक क्रांतीनंतर वाढणाऱ्या उद्योगामुळे हवा, पाणी आणि ध्वनिप्रदूषणासोबतच वेगळे आहे. कारण जमिनीमध्ये वेगवेगळी प्रदूषके दिर्घकाळ राहतात, टिकतात. त्यामुळे जमिनीचा दर्जा कमी होतो. जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढते. ''जमिनीतील प्राकृतिक, रासायनिक व जैविक स्थिती मानवी हस्तक्षेप, अयोग्य नियोजन, वापर व इतर कारणांमुळे जमिनीची उत्पादकता कमी करणारे जे बदल होतात, त्यास भू प्रदूषण असे म्हणतात.''[१]

भूमी प्रदूषण हे वेगवेगळ्या कारणांनी होत असते. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरण हानी होत आहे. कीटकना"ाकांचा अतिरीक्त वापर, रासायनीक खतांचा अतिरीक्त वापर, कचरा

शहरातील सांडपाणी, औद्योगीक प्रदूषके, किरणोत्सर्गी पदार्थ इत्यादी अनेक कारणांमुळे भूमीप्रदूषण होते.

लोकसंख्येमध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. शेतजमिनी बिगर शेतजमिनीत वर्गीकरण करून मोठ्या प्रमाणात शहरी वस्ती वाढत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे कचऱ्याची विल्हवाट, पुन"चक्रीकरण करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. कचऱ्याच्या प्रदूषणामुळे जीवजंतूंचा प्रसार होतो, रोगराई पसरते, दुर्गंधी निर्माण होते. मानवी आरोग्यावर अपायकारक आणि घातक परिणाम होतात. कचऱ्यात प्रामुख्याने घरातील, कार्यालयातील, शेतातील, रस्त्यावरील आणि कारखान्यातील टाकाऊ पदार्थांचा समावे"ा होतो. भाजीपाल्याचा पालापाचोळा, फळांच्या साली, ि"ाळे अन्नपदार्थ, मानवाच्या व अन्य प्राण्यांच्या शरीरातुन मलमुत्रादी पदार्थ, रद्दी कागद, वस्तुंची वेष्टणे, पॅकिंग साहित्य, हॉस्पीटलमधून सुद्धा दररोज मोठा घनकचरा निर्माण होतो. यामधून रोगराई फैलावत असते. दररोज दरडोई सरासरी दोन किलो घाण कचरा मनूष्य करीत असतो. जितका दे"ा अधिक विकसीत तितका कचरा अधिक हे दिसून येते. मुंबई महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन खात्याचे वार्षीक अंदाजपत्रक २००१–२००२. मध्ये ३८५ कोटी रूपये होते.[२]

कचऱ्याच्या व्यवस्थापनाचा प्र"न ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात जास्त प्रमाणात दिसून येतो. शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. कारण लोकसंख्येतील वाढ आणि गरजांची पुर्तता यांच्या परस्पर संबंधामधून व औद्योगीक उत्पादन प्रक्रियेमधून निर्माण होणारा कचरा योग्य प्रमाणात मार्गी लावला जात नाही. त्यामुळे कचऱ्याच्या व्यवस्थापनाची समस्या निर्माण होते.

पर्यावरण विषयक जाणीव जागृतीमध्ये मानवनिर्मित पर्यावरणाचे प्रदूषण कोणत्या प्रकारचे आहे? आणि या प्रदूषणाचा पर्यावरणावर, मानवी जीवनावर कोणत्या प्रकारचा परिणाम होतो हा महत्वाचा अभ्यासविषय आहे. पर्यावरणीय प्रदूषण अनेक प्रकारचे आहे. उदा. हवा प्रदूषण, ध्वनीप्रदूषण, जल प्रदूषण, भूमी प्रदूषण, औष्णीक प्रदूषण इत्यादी. यामध्ये आधुनीक काळात कचरा प्रदूषण ही महत्वाची समस्या आहे.

कचरा प्रदूषणामुळे मोठ्या प्रमाणावर भूमी प्रदूषण तर होतेच पण कचऱ्यामुळे जल प्रदूषण आणि हवा प्रदूषणही घडून येते. औद्यागिकरण, शहरीकरण, उपभोगक्षम नसलेल्या वस्तू, टाकावू पदार्थ यातूनच कचरा निर्माण होतो. शहराच्या विकासाबरोबरच कचऱ्याचे ढीगही वाढत आहेत. कचरा म्हटले की, घरातील केर, व्यापार, कारखाने, त्यातील त्याज्य वस्तू कृषाव्यवसायातील टाकावू पदार्थ, खाणकाम,पाणी शुद्धीकरण योजनेतील टाकाऊ वस्तू यांचा अंतर्भाव होतो.

'' कुठल्याही नको असलेल्या आणि फेकण्यात आलेल्या पदार्थाला कचरा असे म्हणतात. ''३

कचरा निर्मितीच्या प्रमूख उगमस्थानात घरातील केर, दुकाने, कार्यालये, उपहारगृहे, हॉस्पीटल, शैक्षणीक संस्था व कारखाने यांचा समावे"ा होतो. घरगुती त्याज्य वस्तुंचे प्रमाण हे साधारणतः **७०** टक्के असते. कचऱ्यात कागद, भाजीपाला, सेंद्रीय पदार्थ, धुळ, प्लॅस्टीक, दगड, काचा, अकार्यक्षम टी.व्ही., कॉम्प्युटर इत्यादी यांचा समावे"ा होतो. कचऱ्याचे मानवी जीवनावर अनेक विपरीत स्वरूपाचे परिणाम होत असतात. अनेक रोगांच्या प्रसारास हा कचरा कारणीभूत ठरतो. सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या दे"ाांमध्ये आरोग्य रक्षणासाठी घ्यावयाची काळजी योग्य प्रकारे न घेतल्याने अनेक गंभोर साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे दाखले इतिहासात ही

आढळतात. वैयक्तिक आरोग्याबरोबरच पर्यावरणावर ही या गोष्टींचे गंभीर परिणाम होतात. टाकाऊतुन टिकाऊ पदार्थांची निर्मिती पुर्नवापर पर्यावरणपुरक गोष्टीची निर्मिती अ"ा सकारात्मक योग्य पध्दतीने केलेले कचरा व्यवस्थापन महत्वाचे आहे. त्यामुळे कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे.[४]

शहरी आणि औद्योगीक क्षेत्रातून निर्माण होणारा घनकचरा, त्यापासून निर्माण होणाऱ्या समस्या टाळण्यासाठी पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी ''कचऱ्याचे व्यवस्थापन'' करणे गरजेचे झाले आहे. आजच्या काळात या विषयाचे वाढते महत्व लक्षात घेवून स"ोधकाने **'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेषण''(पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)** हा विषय स"ोधनासाठी निवडला.

२.२ संशोधन विषयाचे महत्त्व

घनकचरा म्हणजे रोजच्या वापरातून उरलेल्या निरूपयोगी वस्तुंचा साठा आपली घरे, कार्यालये, दुकाने, भाजी मंडई आहार गृहे, सार्वजनीक संस्था, औद्योगीक संस्था, रूग्णालये, शेती, बांधकामे या सर्व ठिकाणाहून अनेक वेगवेगळया प्रकारचा कचरा रोजच्या रोज तयार होत असतो. महाराष्ट्रात एका वर्षात अंदाजे ९३ लाख टन कचरा तयार होतो. महाराष्ट्रातला प्रत्येक माणूस दर दिवसाला अंदाजे **0**.१४ ते **0**.६३ किलो कचरा करतो. त्यापैकी ७५ लाख टन घन कचरा (८०%)हा नगरपालिका क्षेत्रात तयार होतो. म्हणजेच वर्षाला सुमारे ९३**000** मालगाडीचे डबे भरतील एवढा कचरा महाराष्ट्रात तयार होतो. या ९३**000** डब्यांपैकी ७५**000** डबे शहरांमधल्या कचऱ्याचेच असतात. हा सर्व कचरा केवळ मूख्य करून शहरांमध्ये तयार होणारा

आहे. जागतीक बँकेच्या एका अंदाजानुसार २०२५ मध्ये महाराष्ट्राच्या शहरी भागातून दररोज ५७,६०० टन एवढा कचरा निर्माण होणार आहे.[५]

शहरातून निर्माण होणारा कचरा लांब कुठेतरी पुरला जातो किंवा फेकला जातो आणि तिथे कचऱ्याचे डोंगर साचतात. महाराष्ट्रातल्या कुठल्याही छोटया–मोठया शहरांमध्ये प्रवे"ा करण्यापूर्वी दूरवर पसरलेले प्लास्टिक व कचऱ्यांचे डोंगर आपल्याला पहायला मिळतात. वर्गीकरण न करता, कुठलीही प्रक्रिया न करता अ"ा प्रकारे टाकलेला कचरा हा सर्वच दृष्टीने हानीकारक असतो. उदा. पुणे–सोलापूर महामार्गावर ऊरूळीकांचन या गावात पुणे शहरातला सगळा कचरा पुरे"ा प्रक्रियेविना व योग्य व्यवस्थापनाविना टाकला जातो. गेल्या २० वर्षात तयार झालेल्या कचऱ्याच्या डोंगरांमुळे गावात दुर्गंधी, मा"ा, डासांचे साम्राज्य, कचऱ्यातून पाझरणाऱ्या पाण्यामुळे दुषित बनलेले भूजल, विहरी–बोअरवेल्सचे खराब पाणी आणि त्यामुळे सतत उद्‌भवणाऱ्या आरोग्याच्या समस्या यांनी गंभीर रूप धारण केले आहे.

आपल्या आसपास तयार होणाऱ्या बहुतां"ा कचऱ्यावर प्रक्रिया करून तो पुन्हा उपयागात आणला जाऊ शकतो. परंतु अजुनही आपल्याला याचे गांभीर्य नाही. आपण कचरा वेगवेगळा करण्यासारखी साधी गोष्ट देखील करत नाही. कचऱ्याचे वर्गीकरण न केल्याने त्याचा पुनर्वापर करण्याजोगे बरेच काही वाया जाते. वर्गवारी न केलेला कचरा अखेरीस शहराच्या बाहेर उघडयावर टाकला जातो. ज्यामुळे आजूबाजूचा परिसर गलीच्छ होतो. उघडयावर टाकलेला कचरा तेथेच कुजतो, त्यातून दुर्गंधी सुटते व रोगराई पसरते.

वाढती लोकसंख्या, शहरीकरण, उंचावलेले राहणीमान, औद्योगीकरण, प्लास्टीकचा वाढता वापर यामुळे तयार होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण व प्रकार वाढत जातात. आणि वेगवेगळया समस्या

निर्माण होतात. अस्वच्छता, आजार, प्रदूषण, सौंदर्यहानी आणि पर्यावरणाचे नुकसान असे अनेक प्र"न त्यातूनच निर्माण होतात. कचऱ्याची विल्हेवाट लावायची सर्वात सोपी व स्वस्त पद्धत म्हणजे तो पुरणे किंवा उघडयावर जाळणे. पण त्यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. उघडयावर जाळल्यामुळे किंवा अ"ाास्त्रीय पद्धतीने पुरल्यामुळे हवा, भूजल आणि माती दुषित होते. भविष्यात वाढत जाणारा कचरा आणि त्यामुळे होणारे एकूणच परिणाम पाहता कचऱ्याच्या समस्येकडे आपण प्राधान्याने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. आपण नदी नाल्यांमध्ये तो कचरा टाकून देतो तो हळूहळू समुद्र व नंतर महासागरामध्ये जाऊन मिळतो. समुद्रात वरवर आपल्याला दिसत नसले तरीही हे कचऱ्याचे ढिग खोलवर समुद्रात जाऊन बसलेले असतात.

आपण माणसांनी कचऱ्यात प्लॅस्टिक टाकल्यामुळे प्राण्यांना किती हानी पोहचते याचे गांभीर्य आपल्याला अजुनही नाही. फेब्रुवारी २०१४ मध्ये केरळ मधल्या साबरीमाला वनक्षेत्रात हत्तीणीने प्लॅस्टिक खाल्यामुळे आपले प्राण गमावले या हत्तीणीच्या पोटाच्या आतडयात प्लॅस्टिक पि"ाव्या व धातूपत्रे सापडले. या हत्तीणीने नुकतेच एका पिल्लाला जन्म दिला होता.[६] घनकचरा व्यवस्थापन म्हणजे केवळ कचरा एकत्रित जमा करून त्याची जाळून किंवा पुरून विल्हेवाट लावणे नव्हे. कचरा व्यवस्थापन म्हणजे कचरा गोळा करून त्याचे वर्गीकरण, त्याचा पुनर्वापर किंवा पुनः"चक्रिकरण करणे, योग्यरीत्या त्याची विल्हेवाट लावणे. याबाबत शासनाने नियम बनवले आहेत. ते अत्यंत योग्य आहेत. नागरी घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २000 नुसार कचऱ्याचे वर्गीकरण करणे अनिवार्य आहे. आणि उघडयावर कचरा टाकण्यास बंदी आहे. असं असलं तरी राज्यातल्या सर्व शहरांमध्ये आणि गांवामध्येही कचऱ्याची समस्या आज प्रमाणाबाहेर वाढते आहे. घनकचऱ्याच्या समस्येला सामोरे जाण्यास जरी आपला कायदा सुयोग्य

असला तरी खरी अडचण अंमलबजावणीची आहे. कचऱ्याच्या समस्येला आपण नागरीकही तितकेच जबाबदार आहोत. एका बाजूला आपण निर्माण करत असलेल्या कचऱ्याची नीट विल्हेवाट लावण्याची जबाबदारी आपण घेत नाही, तर दुसऱ्या बाजूला आपला वस्तुंकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलतो आहे. आज बाजारात अनेक वस्तु उपलब्ध आहेत. त्या विकत घेऊ शकण्याची आपली क्षमताही वाढली आहे. एखादी वस्तू विकत घेताना आपल्याला त्याचा नक्की उपयोग आहे की नाही. हे न पाहता आपण नव–नवीन वस्तू घेत राहतो. एखादया वस्तुची आपल्याला खरच गरज आहे का हे न तपासता आपण ती पटकन घेतो.

वाढती लोकसंख्या व आर्थिक परिस्थिती व त्याचबरोबर रोजगार, वैयक्तीक मिळकत, पुन्हा उपयोगात आणण्यासाठी प्रक्रिया करता येण्यासारख्या वस्तुंचे महत्त्व, व्यवस्थापन यंत्रणेची किंमत इतर अ"ा अनेक गोष्टी घनकचरा निर्मितीवर परिणाम करतात. आपली जीवन"ैली व गोष्टी उपभोगण्याची पद्धतच घनकचऱ्याचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत ठरते. आजच्या उपभोक्तावादी समाजामध्ये प्रति व्यक्ती प्रति दिन कचरा वाढीचे प्रमाण लोकसंख्या वाढीच्या प्रमाणापेक्षा अधिक गतीने वाढत आहे. महाराष्ट्रात दर दिव"ी २६,८२0 टनहुन अधिक घनकचरा निर्माण होतो. यापैकी ५0% मुख्य शहरांमधून (मुंबई, ठाणे आणि पुणे) निर्माण होतो. मुंबईमधून प्रत्येक दिव"ी ११,६४५ टन घनकचरा तयार होतो. त्यानंतर पुणे २,७२४ टन प्रतिदिव"ी आणि ठाणे ७७५ टन प्रतिदिव"ी घनकचरा तयार होतो.[७] महाराष्ट्रातील घनकचऱ्याची समस्या ही फार मोठी आहे. आणि ती दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. हा घनकचरा सर्वत्र परिसरात पसरला आहे. आणि तो साफ करणे म्हणजे एक मोठे आव्हान आहे. असक्षम व्यवस्थापनामुळे आधीच प्रदूषित झालेल्या पाणी आणि मातीमध्ये सुधारणा करणे अ"ाक्यप्राय गोष्ट आहे. असक्षम

व्यवस्थापन आणि घनकचरा व्यवस्थापनाबद्दल असलेल्या बेफिकीर दृष्टीकोनाचा परिणाम पर्यावरणाच्या दर्जावर व सार्वजनिक स्वास्थ्यावर होतो आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान, खालावलेले पर्यावरण व सार्वजनिक स्वास्थ्याचा आजचा दर्जा धोकादायक परिस्थिती पेक्षा वर आहे. म्हणून सं"ोधन विषयाचे वाढते महत्व लक्षात घेवून सं"ोधकाने **'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेषण''(पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)** हा विषय अभ्यासासाठी निवडला.

२.३ संशोधन विषयाची व्याप्ती

संशोधकाने **'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेषण''(पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)** हा विषय संशोधनासाठी निवडला. पुणे शहरातील घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रियेचा अभ्यास करताना पुणे शहरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका या दोन महानगरपालिका आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण न करता गोळा झालेला कचरा जमिनीत निचरा करते. पुणे महानगरपालिकेअंतर्गत **२००८-२०१४** कालावधीनुसार **३३** घनकचरा प्रकल्प घनकचऱ्याचे पुन"चक्रीकरण प्रक्रिया करण्याचे कार्य करीत होते. या **३३** संस्थांचे सामाजिक व आर्थिक विश्लेषण इतकी संशोधन विषयाची व्याप्ती मर्यादीत आहे.

२.४ संशोधन समस्या

मानवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण असा पर्यावरणाचा सर्वसामान्य अर्थ असला तरी शास्त्रीयदृष्टया सर्व सजिवांच्या वसती स्थानाभोवती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम

करणाऱ्या घटकांचे भू–जैवीक दृश्य म्हणजे पर्यावरण होय.नैसर्गीक आपत्तीमुळ पर्यावरणाच्या संतुलनात अनेक वेळा बिघाड निर्माण झाले व ते दुरूस्तही झाले. निसर्ग नियमानुसार पर्यावरणाचे संतुलन होण्याची क्षमता निसर्गताच असते. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला गेला. परंतु गेल्या चार पाचशे वर्षापासुन मानवाचा पर्यावरणातील हस्तक्षेप सतत वाढत गेल्याने पर्यावरण विषयक अभ्यासाची गरज निर्माण झाली.

पर्यावरण हे प्राकृतीक जैवीक घटकांचे असते आणि त्याचा मानवासह सर्व सजीवांच्या जीवनावर व त्यांच्या वर्तनावर परिणाम होत असतो. पर्यावरण ही संज्ञा स्थल, कालसापेक्ष आहे. पर्यावरण म्हणजे सजीवांच्या भोवतालची परिस्थिती हाय. नैसर्गीकरित्या पर्यावरणाचे संतुलन बिघडले तर ते दुरूस्त करण्याची क्षमता निसर्गामध्ये असते. परंतु मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले तर ते निसर्गतः दुरूस्त होत नाही ते दुरूस्त करण्यासाठी मानवालाच प्रयत्न करावे लागतात. मानवी आरोग्य अर्थनियोजन सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय सुरक्षितता या सर्वच प्र"नांमध्ये पर्यावरणाचे स्थान या शतकामध्ये अधिक महत्वाचे बनणार आहे.[८] जगातील अनेक छोटया–मोठया राष्ट्रांनी पर्यावरण संरक्षणासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केले आहेत.स्वीडन लवकरच शून्य कचरा(Zero Garbage) असणारा दे"ा म्हणून वाटचाल करत आहे. स्विडनमध्ये फक्त ४ टक्के घनकचराच जमिनीत निचरा केला जातो बाकी घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण केले जाते.[९]

वृक्षसंवर्धन, झाडाफुलांची निगा, पाळीव प्राण्यांची देखभाल इ. सारखे छंद कौटुंबीक पातळीवर जपण्यासाठी फारसा खर्च येत नाही. तसेच कचरा, ध्वनीची पातळी, पाणी शुध्दीकरण

इ. बाबतचे साधे नियम समाजाने पाळले तर सार्वजनिक स्वच्छतेचे आणि पर्यावरण रक्षणाचे उद्दिष्ट गाठणे अवघड नाही. पर्यावरण संरक्षणासाठी केवळ सरकारला जबाबदार धरण्यापेक्षा समाजामध्ये पर्यावरण विषयक जागृती निर्माण करण्याची गरज आहे. पर्यावरण विषयक जाणिव जागृती मध्ये मानव निर्मित पर्यावरणाचे प्रदुषण मोठी गंभीर समस्या आहे. मानव निर्मित पर्यावरण अनेक प्रकारचे आहे. उदा. हवा प्रदूषण, जल प्रदूषण, भूमी प्रदूषण, औष्णीक प्रदूषण इत्यादी यामध्ये आधुनिक काळात कचरा प्रदूषण ही महत्वाची समस्या आहे. कचरा प्रदूषणासाठी पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असतो. ग्रामीण भागामध्ये होणारा कचरा हा जमिनीत पुरून त्यापासून खत तयार केले जाते. परंतु, शहरी भागात कचऱ्याची समस्या पर्यावरणात अडथळा निर्माण करत असते.

घनकचरा व्यवस्थापनाबाबत सर्वोच्च न्यायालयाने १९९९ मध्ये नेमलेल्या समितीच्या अहवालानुसार, सगळया शहरामधला कचरा व्यवस्थापन व हाताळणीसाठी सन २००० पासुनच काही नियम लागु झालेले आहे. त्यानुसार ओला अणि सुका कचरा वेगळा साठविणे, या कचऱ्याची स्थानिक प्र"ाासनामार्फत दररोज उचल होणे आणि दोन्ही प्रकारच्या कचऱ्याचा स्वतंत्र पुर्नवापर करणे या गोष्टींची नियमित कार्यवाही अपेक्षित आहे. मात्र बहुसंख्य शहरामध्ये अदयापही कचऱ्याचे वर्गीकरण व पुर्नवापर होताना दिसुन येत नाही.[१०] त्यामुळे शहरी भागातील 'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेषण''(पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसदर्भात) या संशोधन समस्येचा अभ्यास संशोधकाने केला.

२.५ संशोधनाची उद्दीष्ट्ये

२.५.१ पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा आढावा घेणे.

२.५.२ पुणे महानगरपालिकेअंतर्गत घनकचऱ्याचे पुन"चक्रीकरण प्रक्रिया आणि घनकचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या संस्थांचा अभ्यास करणे.

२.५.३ घनकचऱ्याचे पुन"चक्रीकरण प्रक्रिया करणाऱ्या संस्थांचे, प्रकल्प व्यावसायिक व कामगारांचे सामाजीक आणि आर्थिक वि"लेषण करणे.

२.५.४ घनकचऱ्याचे पुन"चक्रीकरण प्रक्रिया करणा–या प्रकल्पांची माहिती घेणे.

२.५.५ घनकचऱ्याचे व्यवस्थापन प्रक्रियेच्या अंमलबजावणीतून त्रुटी शोधून काढून त्यावर उपाय सुचविणे.

२.५.६ घनकचऱ्याच्या विल्हेवाट आणि पुनः"चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांचा पर्यावरण संतुलनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

२.५.७ पुणे महानगरपालिकेला घनकचऱ्याची विल्हेवाट आणि घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण प्रक्रिया करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा घेणे.

२.६ संशोधनाची गृहीतकृत्ये

२.६.१ घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्प नफा मिळवतात.

२.६.२ घनकचऱ्याच्या पुनः"चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पातून रोजगारसंधी निर्माण होतात.

२.६.३ घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण करण्यात पुणे महानगरपालिकेची भूमिका महत्वाची आहे.

२.७ संशोधनाच्या मर्यादा

सं"ोधक पुणे शहरातील पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रक्रिया प्रकल्पांचे सामाजिक व आर्थिक वि"लेषण करणार आहे. हा कोणत्याही कंपनीचा किंवा संस्थेचा अभ्यास नाही. तर वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण यामुळे घनकचऱ्याची समस्या तीव्र होत चालली आहे. मोठया प्रमाणात घनकचरा निर्मितीचे प्रमाण वाढतच चाललेले आहे. सर्वच्या सर्व घनकचरा जमीनीत निचरा करणे अवघड होत आहे. घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण केल्याने साधनसंपत्तीचा पुर्नवापर होतो. त्यामुळे पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास सं"ोधक करीत आहे.

२.८ संशोधन पद्धती

सं"ोधकाने सहेतूक नमूना निवड पद्धतीच्या आधारे **'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेषण''(पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)** हा विषय सं"ोधनासाठी निवडला. सं"ोधक **२००८-२०१४** या पाच वर्षाच्या आकडेवारीचा अभ्यास करणार आहे.

२.८.१ विषयाची निवड

घनकचऱ्याचे व्यवस्थापन ही जागतीक समस्या आहे. कारण दिवसेंदिवस वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे कचरा निर्मितीचे प्रमाणही वाढत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावणे हा मोठा प्र"न आहे. कचरा गोळा करणे, कचऱ्याचे वर्गीकरण, कचऱ्याची विल्हेवाट, कचऱ्याचे पुन"चक्रीकरण हा एक महत्वाचा अभ्यास विषय आहे. एकूणच या विषयाचे वाढते महत्व लक्षात घेवून सं"ोधकाने **'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेषण''(पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)** हा अभ्यासविषय निवडला.

तक्ता क्रमांक :२.१
जगातील महत्वाच्या देशांमध्ये घनकचरा निर्मितीचे प्रमाण

जगातील प्रमूख देश	घन कचरा प्रमाण (किलो ग्रॅम)
युनायटेड स्टेटस	२.०४
आईसलँड	१.९९
नेदर लँड	१.६७
युनायटेड किंगडम	१.५८
फ्रान्स	१.४५
जपान	१.१३
कॅनडा	०.९५
मेक्सीको	०.८६

Source:What a Waste:A Global Review of Solid Waste Management/World Bank Annual Report 2014

Available on http://www.scuolacascia.it

जगातील प्रमुख दे"ांमध्ये होणारी घनकचरा निर्मिती बघितल्यास घनकचऱ्याचे व्यवस्थापन हा किती मोठा जागतीक प्र"न आहे याची कल्पना येते


तक्ता क्रमांक :२.२
भारतातील महत्वाच्या राज्यांमध्ये घनकचरा निर्मितीचे प्रमाण

घन कचरा प्रती दिवस प्रमाण (मेगाटन)	भारतातील प्रमूख राज्ये
२६,८२०	महाराष्ट्र
१९,१८०	उत्तर प्रदेश
१४,५३२	तामिळनाडू
११,५००	आंध्रप्रदेश/तेलंगणा
९,२२७	गुजरात
८,७८४	कर्नाटक

(Source-Central Pollution Control Board Report April 2015 sited on www.cbcb.nic.in.msw

नकाशा क्रमांक :२.१

भारतातील महत्वाच्या राज्यांमध्ये घनकचरा निर्मितीचे प्रमाण



Sited on http://kxsd.org/index.php?option.com accessed on 23/10/2015 at 11.36 a.m.

वरील तक्ता क्रमांक **२.२** वरून समजते की, महाराष्ट्र राज्य भारतातील सर्वात जास्त घनकचरा निर्माण करणारे राज्य आहे. एका दिवसाला महाराष्ट्र राज्यात २६८२**0** मेगाटन घनकचरा निर्माण होतो. **उत्तर प्रदेश** १९,१८० आणि तामिळनाडू १४,५३२ मेगाटन घनकचरा या राज्यांमध्ये एका दिवसात निर्माण होतो. या आकडेवारीवरून दिसून येते की भारतामध्ये तर घनकचरा व्यवस्थापनाचा प्र"न गंभीर आहेच. पण भारतातील महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त घनकचरा निर्मिती होते. त्यामुळे महाराष्ट्राच्या दृष्टीनेही हा प्र"न अति"ाय गंभीर आहे. भारतातील महत्वाच्या राज्यांमध्ये शहरी भागात घनकचरा निर्मितीची टक्केवारी पुढील तक्ता क्रमांक :**२.३** मध्ये दिसून येते.

तक्ता क्रमांक :२.३
भारतातील महत्वाच्या राज्यांमध्ये शहरी भागात घनकचरा निर्मितीची टक्केवारी

भारतातील प्रमूख राज्ये	शहरी भागातील घनकच्चरा (टक्केवारी)
महाराष्ट्र	१७.१ %
वेस्ट बंगाल	१२ %
उत्तर प्रदेश	१० %
तामिळनाडू	९ %
दिल्ली	८.९ %
आंध्रप्रदेश	८.८ %
कर्नाटक	६ %
गुजरात	५.४ %
राजस्थान	३.८ %
मध्यप्रदेश	३.५ %
इतर राज्य	१५ .६ %
एकूण	१०० %

Source: Sunstainable Solid Waste Management in India:Municipal Solid Waste Available on http://swmindia.blogspot.in/2012/01/msw-gene-accesseed on 23-10-2015 at 11.36 a.m

२.८.२ कार्यक्षेत्राची निवड :–

महाराष्ट्र राज्यातील प्रमुख शहरांमध्ये होणाऱ्या घनकचऱ्याची निर्मिती पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट केली आहे.

तक्ता क्रमांक :– २.४

महाराष्ट्र राज्यातील प्रमुख शहरांमध्ये होणाऱ्या घनकचऱ्याची निर्मिती

अ.क्र.	शहर	घनकचरा (टन एकदिवस)
१	मुंबई	११,६४५
२	पुणे	०२,७२४
३	नागपूर	००,८३८
४	ठाणे	००,७७५
५	औरंगाबाद	००,७०२
६	कल्याण–डोंबिवली	००,६७२
७	पिंपरी–चिंचवड	००,५६७
८	सोलापूर	००,५५१
९	भिंवडी	००,४८९
१०	नाशिक	००,३४५
११	कोल्हापूर	००,३०५
१२	सांगली	००,३०१
१३	उल्हासनगर	००,२६६
१४	नांदेड	००,२३७
१५	अमरावती	००,२३६
१६	माळेगाव	००,२२६
१७	अकोला	००,२२१
१८	जळगाव	००,२१८
१९	लातूर	००,१९०
२०	धुळे	१८८
२१	अहमदनगर	१७०
२२	चंद्रपूर	१६०
२३	इचलकरंची	१५८
२४	परभणी	१४३
२५	जालना	१३०
२६	अंबरनाथ	११५

२७	भूसावळ	१०३
२८	यवतमाळ	७८
२९	बीड	७५
३०	गोंदिया	७१
३१	नवघर–माणिकपूर	६६
३२	वर्धा	६२
३३	नवी मुंबई	६१
३४	सातारा	६१
३५	जबलपूर	५१
३६	बारशी	५१

Source: Sunstainable Solid Waste Management in India;municipal solid waste generation in India sited on http://swmindia.blogspot.in/2011

वरील तक्त्यानुसार (तक्ता क्रमांक २.४) महाराष्ट्र राज्यात मुंबई शहरानंतर पुणे शहरातच सर्वात जास्त टन घनकचरा एका दिवसाला निर्माण होतो म्हणूनच स"ोधकाने पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास हा स"ोधनाचा विषय निवडला.

२.८.३. नमूना निवड :–

पुणे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता घनकच-याचे व्यवस्थापन ही मोठी समस्या झाली आहे. पुणे महानगरपालिका किती य"ास्वीपणे हे कार्य करते याचा विचार करणे महत्वाचे आहे.

तक्ता क्रमांक २.५


पुणे शहराची वाढती लोकसंख्या

अ.क्र.	लोकसंख्या मोजमाप वर्ष	लोकसंख्या
१	१९५१	४८८४१९
२	१९६१	६,०६,७७७
३	१९७१	८,५६,१०५
४	१९८१	१२,०३,३६३
५	१९९१	१६,९१,४३०
६	२००१	२५,३८,४७३
७	२०११	३१,१५,४३१

Source: Cencus of India 2011: Demographic Data of Pune City Sited on http://swmindia.blogspot.in/2012

नकाशा क्रमांक २.२


पुणे शहराची एकुण लोकसंख्या आणि भाहरी लोकसंख्येचे वाढते प्रमाण



Source: Population & Municipal Solid Waste Generation in India Available on http://swmindia.blogspot.in/2012

नकाशा क्रमांक २.३

पुणे शहरातील वॉर्डमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची निर्मिती



पुणे शहरामध्ये १५ वॉर्डमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची निर्मिती पुढील नका"ामध्ये दाखविली आहे.[११] पुणे शहरामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका या दोन महानगरपालिका कार्य करत आहेत. 'घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी कायदा **२०००**' नुसार औद्योगीक क्षेत्रातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी संबधित औद्योगीक संस्थेची स्वतःची असते. बायो मेडीकल घनकचऱ्याचे व्यवस्थापन 'पास्को' या संस्थेकडे सोपविण्यात आले आहे. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी कायदा **२०००** नूसार स्थानिक स्वराज्य संस्थेने सार्वजनीक आणि घरगुती वापरातून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन

केले पाहिजे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये औद्योगीक क्षेत्र जास्त आहे. त्यामुळे साधारण दिवसाला **५००** ते **६००** मेगाटन घनकचरा निर्माण होतो. पुणे महानगरपालिकेमध्ये हेच प्रमाण **१६००** मेगाटन आहे.[१२] त्यामुळे सं"ोधकाने **'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेषण''(पुणे शहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)** हा अभ्यासविषय निवडला. पुणे महानगरपालिकेने घनकचऱ्याची विल्हेवाट आणि कचऱ्याचे पुन"चक्रीकरण/ प्रक्रिया करण्याचे कार्य ३३ प्रकल्पांकडे सोपविले होते. त्यापैकी हांजीर बायोटेक हा प्रकल्प फेब्रुवारी **२०१४** पासुन बंद पडला आहे. सध्या पुणे शहरातील संपूर्ण कचरा रोजच्या रोज या प्रकल्पांकडे सोपविण्याचे कार्य महानगरपालिका करते. घनकचऱ्याची विल्हेवाट आणि पुनः"चक्रीकरण करण्यासाठी जागाही महानगरपालिकेनेच उपलब्ध करून दिली आहे. महानगरपालिका स्वतः स्थिर भांडवल गुंतवुन यंत्रसामुग्री प्रकल्पांना उपलब्ध करून देते. या प्रकल्पांच्या व्यवस्थापकांनी कामगारांची नेमणुक करून प्रक्रिया प्रकल्प योग्य रितीने चालत आहेत का याची देखरेख करायची असते. बऱ्याचदा काही प्रकल्प स्वतः स्थिर भांडवल गुंतवितात. परंतु अ"ाा वेळी कचऱ्यापासुन निर्माण वस्तुंची त्या प्रकल्पाचे मालक स्वतः विक्री करतात पुणे महानगरपालिका घनकचरा गोळा करून या ३२ प्रकल्पांकडे कसा पोहचविते त्यासाठी पुणे महानगरपालिकेला होणारा खर्च याचा अभ्यास करताना सं"ोधक **२००८-२०१४** या पाच वर्षाच्या आकडेवारीचा अभ्यास करणार आहे. पुणे महानगरपालिकेने पुढील ३३ प्रकल्पांकडे घनकचऱ्याची विल्हेवाट आणि पुनः"चक्रीकरणाचे कार्य[१३] सोपविले आहे.

तक्ता क्रमांक २.६

पुणे महानगरपालिकेने घनकचऱ्याची विल्हेवाट आणि पुनःश्चक्रीकरणाचे कार्य सोपविलेल्या कंपन्या/कचरा प्रक्रिया प्रकल्प

अ.क्र	प्रकल्प चालक व ठिकाण	क्षमता	प्रकार
१	हांजर बायोटेक	१००० मे. टन	कंपोस्ट,R.D.F,चारकोल,बायोडिझेल
२.	रोकेम सेपरेशन(इं)प्रा.लि–रामटेकडी इंडस्ट्रियल इस्टेट	७०० मे. टन	कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प
३.	दिशा वेस्ट मॅनेजमेंट-रामटेकडी हडपसर	१०० मे टन	गांडुळखत
४.	अजिंक्य बायोफर्ट १ -हडपसर	१०० मे टन	गांडुळखत
५.	अजिंक्य बायोफर्ट १ -हडपसर	१०० मे टन	गांडुळखत
६.	मेलहेम बायोगॅस प्लॅट-औंध	५ मे टन	बायोगॅस
७.	मेलहेम बायोगॅस प्लॅट-येरवडा हौसिंग बोर्ड	५ मे टन	बायोगॅस
८.	मेलहेम बायोगॅस प्लॅट-कात्रज रेल्वे म्युझियम	५ मे टन	बायोगॅस
९.	एम्प्रोटेक सोल्युशन बायोगॅस प्लॅट- बावधन	५ मे टन	बायोगॅस
१०.	एम्प्रोटेक बायोगॅस प्लॅट- हडपसर	५ मे टन	बायोगॅस
११.	एम्प्रोटेक बायोगॅस प्लॅट- मॉडेल कॉलनी	५ मे टन	बायोगॅस
१२.	एम्प्रोटेक सोल्युशन - वानवडी	५ मे टन	बायोगॅस
१३.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅट - पेशवेपार्क १	५ मे टन	बायोगॅस
१४.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅट - पेशवेपार्क २	५ मे टन	बायोगॅस
१५.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅट - कात्रज १	५ मे टन	बायोगॅस
१६.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅट - कात्रज १	५ मे टन	बायोगॅस
१७.	आद्या एन्व्हायरोमेंट -धानोरी	५ मे टन	बायोगॅस
१८.	आद्या एन्व्हायरोमेंट -तळजाई पठार १	५ मे टन	बायोगॅस
१९.	आद्या एन्व्हायरोमेंट -तळजाई पठार २	५ मे टन	बायोगॅस
२०.	ग्रीनलिफ - फुलेनगर	५ मे टन	बायोगॅस
२१.	एम्प्रोटेक सोल्युशन - बानेर	५ मे टन	बायोगॅस
२२.	एम्प्रोटेक सोल्युशन - वडगाव खुर्द १	५ मे टन	बायोगॅस
२३.	एम्प्रोटेक सोल्युशन - वडगाव खुर्द २	५ मे टन	बायोगॅस
२४.	एम्प्रोटेक सोल्युशन - के.के मार्केट	५ मे टन	बायोगॅस
२५.	मेलहेम इंजिनिरर्स प्रा.लि. कात्रज -३	५ मे टन	बायोगॅस

२६.	मेलहेम इंजिनिरर्स प्रा.लि. कात्रज -४	५ मे टन	बायोगॅस
२७.	जे.के. इंजिनिरर्स -वडगाव शेरी	५ मे टन	बायोगॅस
२८.	सेव्ह एन्व्हायरो -रामटेकडी	५ मे टन	मेकॅनिकल कंपोस्ट
२९.	एक्सेल इंडस्टिज -औंध	२ मे टन	मेकॅनिकल कंपोस्ट
३०.	सेव्ह एन्व्हायरो -कोरेगाव पार्क	३ मे टन	मेकॅनिकल कंपोस्ट
३१.	इकोमन एन्व्हायरो सिस्टिम प्रा.लि. -कर्मशाळा, घोरपडी पेठ	५ मे टन	मेकॅनिकल कंपोस्ट
३२.	इकोमन एन्व्हायरो सिस्टिम प्रा.लि., सदाशिव पेठ	३ मे टन	मेकॅनिकल कंपोस्ट
३३.	इकोमन एन्व्हायरो सिस्टिम प्रा.लि.-वर्तक गार्डन, नारायण पेठ	५०० कि.लो.	मेकॅनिकल कंपोस्ट

(स्त्रोत : माहितीपत्रक–पुणेमहानगरपालिका)

तक्ता क्रमांक २.७
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यावसायिकांची नमुना निवड तक्ता

अ.क्र.	प्रकल्प	व्यावसायिकांचे संख्या	प्लॅन्टची संख्या	प्रकल्प प्रकार
१.	हांजर बायोटेक	१	१	कंपोस्ट,R.D.F,चारकोल,बायोडिझेल
२.	रोकेम सेपरेशन	१	१	वीजनिर्मिती
३.	दिशा वेस्ट मॅनेजमेटं	१	१	गांडुळखत
४.	अजिंक्य बायोफर्ट	१	२	गांडुळखत
५.	मेलहेम बायोगॅस प्लॅट	१	५	बायोगॅस
६.	एम्प्रोटेक बायोगॅस प्लॅट	१	८	बायोगॅस
७.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅट	१	५	बायोगॅस
८.	आद्या एन्व्हायरोमेंट	१	३	बायोगॅस
९.	जे.के. इंजिनिरर्स	१	१	बायोगॅस
१०.	सेव्ह एन्व्हायरो	१	२	मेकॅनिकल कंपोस्ट
११.	एक्सेल इंडस्टिज	१	१	मेकॅनिकल कंपोस्ट
१२.	इकोमन एन्व्हायरो	१	३	मेकॅनिकल कंपोस्ट
एकुण		१२	३३	

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

या ३३ प्रकल्पांची विभागणी १२ व्यावसायिकांमध्ये झालेली आहे.त्यामुळे घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे सामाजिक व आर्थिक वि"लेषण करताना १२ व्यावसायिकांकडुन अनुसुचीद्वारे सं"ोधक तथ्य संकलित करणार आहे. त्यामूळे सहेतुक नमुना निवड पद्धतीने या १२ व्यावसायिकांची निवड केली आहे.

तक्ता क्रमांक २.८
पुणे महानगरपालिकेने घनकचऱ्याची विल्हेवाट आणि पुनः"चक्रीकरण प्रक्रिया करण्याचे कार्य सोपविलेल्या ३३ प्रकल्पांमध्ये तयार होणाऱ्या वस्तु

अ.क्र.	तयार होणारी वस्तु	घनकचऱ्याचा वापर करून वस्तु तयार करणाऱ्या प्रकल्पांची संख्या
१	कंपोस्ट,R.D.F,चारकोल,बायोडिझेल	०१
२	वीजनिर्मिती	०१
३	गांडुळखत	०३
४	बायोगॅस	२२
५	मेकॅनिकल कंपोस्ट	०६
एकुण		**३३**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

या प्रकल्पांची घनकचरा व्यवस्थापनात काय भूमिका आहे. घनकचऱ्याची विल्हेवाट आणि घनकचऱ्याचे पुन"चक्रीकरण **प्रक्रिया** करताना येणारा खर्च आणि विक्री पद्धतीचा अभ्यास सं"ोधक करत आहे.

तक्ता क्र २.९
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कामगारांची नमुना निवड

घनकचराप्रक्रिया प्रकल्प संख्या	कामगारांची एकुण संख्या		कामगारांचीनमुना निवड		टक्केवारी	
	अधिकारी वर्ग	कामगार वर्ग	अधिकारी वर्ग	कामगार वर्ग	अधिकारी वर्ग	कामगार वर्ग
३३	६५	८६९	१०	७०	१५.३८%	८.०५%
एकुण	९३४		८०		८.५६%	

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये काम करणारे कामगार व अधिकारी यांच्याकडुन सं"ोधकांनी अनुसुची भरून घेतली सर्वेक्षणाच्या वेळी जे अधिकारी व कामगार वेळ देण्यास उपलब्ध झाले त्यांची नमुना निवड करण्यात आली सहेतुक नमुना निवड पध्दतीच्या आधारे तथ्य संकलन सं"ोधकाने केले. सहेतुक नमुना निवड पद्धतीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कामगाराची निवड केली आहे.

२.८.४. तथ्य संकलन आणि तथ्य विश्लेषण :–

तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा वापर सं"ोधक करणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :– १. व्यवस्थापकांची मुलाखत

२. अनुसुची

द्वितीय स्त्रोत :– १. पुणे महानगरपालिका उपलब्ध माहिती आणि माहितीपत्रक

२. पुस्तके, मासिके

३. वर्तमानपत्रे, वेबसाईट्स

४. सं"ोधन अहवाल

वरील स्त्रोतांचा वापर सं"ोधक सामाजीक, आर्थिक निकषांच्या आधारे संख्यात्मक आणि गुणात्मक वि"लेषण करणार आहे.[१४]

२.८.५. प्रकरण नियोजन :–

प्रकरण १ – पर्यावरणशास्त्राची ओळख

प्रकरण २ – संशोधन आराखडा

प्रकरण ३ – साहित्याचा परामर्श

प्रकरण ४ – पुणे शहरविषयक भौगोलीक माहिती

प्रकरण ५ – 'घनकचरा पुनःश्चक्रीकरणः एक अर्थशास्त्रीय विश्लेशण'

(पुणेशहरातील प्रक्रिया प्रकल्पांसंदर्भात)

प्रकरण ६ – गृहितकृत्याचे परिक्षण

प्रकरण ७ – निष्कर्ष

प्रकरण ८ – उपाययोजना

परिशिष्टे :– **१. संदर्भग्रंथसुची**

२. अनुसुची

३. निवडक छायाचित्रे

२.९ सारांश

या प्रकरणात संशोधनाचा आराखडा ठरविताना संशोधकाने जगातील महत्वाच्या देशांमध्ये होणाऱ्या घनकचऱ्याची निर्मिती भारतातील महत्वाच्या राज्यामध्ये होणाऱ्या घनकचरा निर्मितीचे प्रमाण लक्षात घेतले त्यानुसार भारतात महाराष्ट्र हे राज्य सर्वात जास्त घनकचरा निर्मिती करणारे राज्य आहे. आणि महाराष्ट्रातील मुबंई हे शहर सर्वाधिक घनकचरा निर्मिती करणारे शहर आहे. मुबंईनंतर पुणे हे महाराष्ट्रातील सर्वाधिक घनकचरा निर्मितीचे शहर आहे. पुण्याची वाढती लोकसंख्या लक्षात घेता वॉर्डप्रमाणे पुणे शहरातील घनकचरा निमिर्तीचे प्रमाण संशोधकाने लक्षात घेतले. पुणे महानगरपालिकेमध्ये दरदिवशी १६०० मेगाटन घनकचरा निर्मिती होते. या घनकचऱ्याच्या पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांचा अभ्यास करीत आहे.

संदर्भ-ग्रंथसुची

१. किर्दात एस.बी, ननवरे एस्.एन,(२००६) 'पर्यावरणीय जाणीव जागृती' निराली प्रका"ान पुणे पान क्र.५.१५

२. New Practices of waste Management case of Mumbai sited on citeseerx.ist.psu.edu/viewdoc

हांजर बायोटेक मार्फत प्लास्टिकचे पुनः"चक्रीकरण करून प्लास्टिकचे गोळे बनविले जातात ते शेतासाठी लागणारे पाईप, प्लास्टीकची दोरी, वेफर्स, कुरकुरे यांचे रॅपर्स यासाठी वापरले जातात. सुका घन कचरा वेगळा काढून तो सुकवुन क"ा करून इंधनासाठी वापरला जातो. ओला घनकचरा वेगळा करून त्यापासून सेंद्रीय खत तयार केले जाते. कचऱ्यामधुन मिळणारी वाळू बांधकाम साहित्य वेगळे काढुन चाळून पुन्हा बांधकामासाठी ती वाळू वापरली जाते. घनकचऱ्यापैकी ८0% घनकचरा हांजर प्रक्रिया करून पुन्हा वापरात आणते व फक्त २0% घनकचरा जमिनीत निचरा केला जातो. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होते. हांजर बायोटेक ने पुणे महानगरपालिकेबरोबर २00६ मध्ये करार केला आणि २00८ पासुन पुणे महानगरपालिकेने दिलेल्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यास हांजर ने सुरवात केली. त्यासाठी महानगरपालिकेने

फुरसुंगीमध्ये २२ एकर जागा हांजरला उपलब्ध करून दिली. हांजर बायोटेक पुणे ची क्षमता दिवसाला १000 टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याची आहे. परंतु ओला कचरा आणि सुका कचरा याच्या वर्गीकरणाच्या अडचणीमुळे ही क्षमता पुर्णपणे वापरली जात नाही. त्यामुळे कचऱ्याचे ठीग साठून राहतात. त्यातुन फुरसुंगी भागामध्ये लोकांच्या आरोग्याचा प्र"न निर्माण झाला आहे. तेथील हवा आणि पाणी प्रदूषित झाले आहे. २00८ ते २0१३ या कालावधीत हाण्जर बायोटेक ने पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनात महत्त्वपुर्ण कामगिरी बजावली आहे. यामध्ये नक्कीच दुमत नाही. हांजर बायोटेक हा कचरा प्रकल्प फेब्रुवारी २०१४ पासुन बंद आहे.

५.१.२ अजिंक्य बायोफर्ट

अजिंक्य बायोफर्ट ही कंपनी घनकचऱ्यापासून खतनिर्मिती करते. पंधरावर्षापासून भारतामध्ये अजिंक्य बायोफर्ट कार्य करीत आहे. १९९३ मध्ये श्री. सती"ा धरणे यांनी अजिंक्य बायोफर्ट सुरू केली. अजिंक्य बायोफर्ट रामटेकडी २00 मेगाटन घनकचरा दर दिव"ी पुणे महानगरपालिकेकडून घेते आणि सेंद्रीय खतनिर्मिती करते. अजिंक्य बायोफर्ट हा गांडुळखत प्रकल्प आहे. अजिंक्य बायोटेक या कचरा प्रकल्पाचे दोन प्लॅन्ट पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत आहेत.

तक्ता क्र ५.१

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत अजिंक्य बायोटेक कचरा प्रकल्पाचे प्लॅन्ट

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	ठिकाण	कचराप्रक्रिया क्षमता	स्थापना वर्षे
१.	अजिंक्य बायोटेक –१	हडपसर	१०० मे. टन	२०१०
२.	अजिंक्य बायोटेक –२	हडपसर	१०० मे. टन	२०१०

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.१.३ दिशा वेस्ट मॅनेजमेंट

दि"ा वेस्ट मॅनेजमेंट हा एक गांडूळखत प्रकल्प आहे. पुणे महानगरपालिकेने रामटेकडी पुणे येथे दि"ा प्रकल्पास जागा उपलब्ध करून दिली आहे. दररोज १00 मेगाटन घनकचरा पुणे महानगरपालिकेमार्फत दि"ा प्रकल्पास उपलब्ध करून दिला जातो. २0११ पासुन हा प्रकल्प कार्यरत आहे हा प्रकल्प शेतकी उदयोग आहे. प्रामुख्याने घरगुती ओल्या कचऱ्यापासुन सेंद्रीय खत निर्माण केले जाते. घनकचऱ्यापासुन केलेले खतनिर्मितीची निर्यात हा प्रकल्प करतो. दिशा वेस्ट मॅनेजमेंट हा गांडुळखत प्रकल्प आहे.

५.१.४ एम्प्रोटेक बायोगॅस

एम्प्रोटेक बायोगॅस प्रकल्पास पुणे महानगरपालिकेने रामटेकडी, पुणे येथे जागा उपलब्ध करून दिली आहे. २00९ पासुन संजय नांद्रे यांनी हा प्रकल्प सुरू केला आहे. बायोगॅस हा वीजनिर्मिती आणि खतनिर्मिती प्रकल्प आहे. पुणे महानगरपालिकेमार्फत या प्रकल्पास दररोज ४0 ते ५0 मेगाटन घनकचरा उपलब्ध करून दिला जातो. एम्प्रोटेकचे ८ बायोगॅस प्लॅन्ट पुणे महानगरपालिकेअंतर्गत पुणे शहरात कार्यरत आहेत.

तक्ता क्र ५.२

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत एम्प्रोटेक बायोगॅस कचरा प्रकल्पाचे प्लॅन्ट

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	ठिकाण	कचराप्रक्रिया क्षमता	स्थापना वर्षे
१	एम्प्रोटेक सोल्युशन बायोगॅस प्लॅन्ट	बावधन	५ मे टन	२००९
२	एम्प्रोटेक बायोगॅस प्लॅन्ट	हडपसर	५ मे टन	२०१०
३	एम्प्रोटेक बायोगॅस प्लॅन्ट	मॉडेल कॉलनी	५ मे टन	२०१०
४	एम्प्रोटेक सोल्युशन	वानवडी	५ मे टन	२०१०
५	एम्प्रोटेक सोल्युशन	बाणेर	५ मे टन	२०१३
६	एम्प्रोटेक सोल्युशन	के.के.मार्केट	५ मे टन	२०१३
७	एम्प्रोटेक सोल्युशन	वडगाव खुर्द–1	५ मे टन	२०१४
८	एम्प्रोटेक सोल्युशन	वडगाव खुर्द–2	५ मे टन	२०१४

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.१.५ रोकेम सिस्टमस

रोकेम सेपरे"ान सिस्टीम २०१० पासून हडपसर पुणे येथे कार्यरत झाली. ७०० मेगाटन वर्गवारी न केलेला कचरा वापरून १० मेगाटन वीजनिर्मिती करणारा हा प्रकल्प आहे. रोकेम ला ६०० ते ७०० मेगाटन घनकचरा पुणे महानगरपालिका गोळा करून पुरवते. सध्या रोकेम प्रकल्प प्रोसेसिंग प्रक्रिया करीत आहे. कोणत्याही प्रकारे पर्यावरणाची हानी न करता इको फ्रेंडली वीजनिर्मिती करणारा हा प्रकल्प आहे

५.१.६ ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅन्ट

ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅन्ट २००८ मध्ये सुरू झाला. आशिष दत्त हे ग्रीनलिफचे संचालक आहेत. ग्रीनलिफ प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे. ग्रीनलिफ बायोगॅसचे ५ घनकचराप्रकल्प पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत आहेत.

तक्ता क्र ५.३

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत ग्रीनलिफ बायोगॅस कचरा प्रकल्पाचे प्लॅन्ट

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	ठिकाण	कचराप्रक्रिया क्षमता	स्थापना वर्षे
१.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅन्ट	कात्रज १	५ मे. टन	२००९
२.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅन्ट	कात्रज २	५ मे. टन	२००९
३.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅन्ट	पेशवे पार्क १	५ मे. टन	२०१०
४.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅन्ट	पेशवे पार्क २	५ मे. टन	२०१४
५.	ग्रीनलिफ बायोगॅस प्लॅन्ट	फुलेनगर	५ मे. टन	२०१४

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.१.७ आदया एन्व्हायरोमेंट

आद्या हा बायोगॅस प्रकल्प पुणे महानगरपालिकेअंतर्गत **२०१३** पासून कार्यरत आहे. ही एक प्रायव्हेट लिमिटेड संस्था आहे. आदया एन्व्हायरोमेंटचे **३** बायोगॅस प्लॅन्ट पुणे महानगरपालिकेअंतर्गत पुणे **शहरात** कार्यान्वित आहेत. प्रत्येक प्लॅन्टची कचरा प्रक्रिया क्षमता एका दिवसाला **५** मे. टन इतकी आहे.

तक्ता क्र ५.४

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत आदया एन्व्हायरोमेंट बायोगॅस कचरा प्रकल्पाचे प्लॅन्ट

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	ठिकाण	कचराप्रक्रिया क्षमता	स्थापना वर्षे
१.	आद्या एन्व्हायरोमेंट	धानोरी	५ मे. टन	२०१३
२.	आद्या एन्व्हायरोमेंट	तळजाई पठार १	५ मे. टन	२०१३
३.	आद्या एन्व्हायरोमेंट	तळजाई पठार २	५ मे. टन	२०१३

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.१.८ मेलहेम इंजिनिरर्स प्रा. लि.

मेलहेम इंजिनिरर्स ही एक प्रायव्हेट लिमिटेड संस्था आहे. **१९९५** मध्ये स्थापना झाली. समीर रेगे हे मेलहेमचे मुख्य संचालक आहेत. समीर रेगे यांना पंतप्रधानांतर्फे सफाई गिरी ॲवार्ड मिळालेला आहे. मेलहेमच्या संपुर्ण देशभरात अनेक **शाखा** आहेत. परंतु पुणे **शहरात** महानगरपालिकेअंतर्गत पुणे **शहरात** पाच प्लॅन्ट कार्यरत आहेत. मेलहेम हा बायोगॅस प्रकल्प आहे

तक्ता क्र ५.५

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत मेलहेम बायोगॅस कचरा प्रकल्पाचे प्लॅन्ट

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	ठिकाण	कचराप्रक्रिया क्षमता	स्थापना वर्षे
१.	मेलहेम बायोगॅस प्लॅन्ट	**औंध**	५ मे. टन	२००८
२.	मेलहेम बायोगॅस प्लॅन्ट	**येरवडा हौसिंग बोर्ड**	५ मे. टन	२००८

३.	मेलहेम बायोगॅस प्लॅन्ट	**कात्रज रेल्वेम्युझियम**	५ मे. टन	२००८
४.	मेलहेम इंजिनियर्स प्रा लि.	**कात्रज ३**	५ मे. टन	२०१२
५.	मेलहेम इंजिनियर्स प्रा लि.	**कात्रज ४**	५ मे. टन	२०१२

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.१.९ जे.के.इंजिनियर्स

जे.के.इंजिनियर्स हा एक बायोगॅस प्रकल्प आहे. जनार्दन नेमिसे हे या संस्थेचे मालक आहेत. या संस्थेची स्थापना १९९६ मध्ये झाली. २००८ पासुन पुणे महानगरापालिकेअंतर्गत पुणे शहरात जे.के.इंजिनियर्स कचरा प्रकल्प कार्यान्वित आहे. या प्लॅन्टची घनकचरा प्रक्रिया क्षमता एका दिवसाला ५ मे. टन इतकी आहे.

५.१.१० इकोमन

इकोमन ही प्रायव्हेट लिमिटेड संस्था आहे. बिपीन साळुंखे या संस्थेचे मालक आहेत. संस्थेची स्थापना २००९ मध्ये झाली इकोमन हा कंपोस्ट कचरा प्रकल्प आहे. इकोमन ३ कंपोस्ट कचरा प्रकल्प २०१४ पासून पुणे महानगरपालिकेअंतर्गत पुणे शहरात कार्यान्वित आहे.

तक्ता क्र ५.६

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत इकोमन कचरा प्रकल्पाचे प्लॅन्ट

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	ठिकाण	कचराप्रक्रिया क्षमता	स्थापना वर्षे
१.	इकोमन एन्व्हायरो सिस्टिम प्रा.लि.	घोरपडी पेठ	५ मे. टन	२०१४
२.	इकोमन एन्व्हायरो सिस्टिम प्रा.लि.	सदाशिव पेठ	३ मे. टन	२०१४
३.	इकोमन एन्व्हायरो सिस्टिम प्रा.लि.	नारायण पेठ	५०० कि.लो.	२०१४

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.१.११ सेव्ह एन्व्हायरो

सेव्ह एन्हायरो मेकॅनिकल कंपोस्टचे कचरा प्रकल्प पुणे महानगरपालिकेअंतर्गत पुणे शहरात कार्यान्वित आहेत. सेव्ह एन्व्हायरोचे २ प्लॅन्ट मेकॅनिकल कंपोस्टींग करतात.

तक्ता क्र ५.७

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत सेव्ह एन्व्हायरो कचरा प्रकल्पाचे प्लॅन्ट

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	ठिकाण	कचराप्रक्रिया क्षमता	स्थापना वर्षे
१.	सेव्ह एन्व्हायरो	रामटेकडी	५ मे. टन	२००८
२.	सेव्ह एन्व्हायरो	कोरेगाव पार्क	३ मे. टन	२०१३

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.१.१२ एक्सेल इंडस्ट्रिज

एक्सेल इंडस्ट्रिज हा मेकॅनिकल कंपोस्ट कचरा प्रकल्प पुणे महानगरपालिके अंतर्गत पुणे शहारात औंध येथे २०१२ पासून कार्यरत आहे. एका दिवसाला २ मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता एक्सेल इंडस्ट्रिज मध्ये आहे.

अशाप्रकारे पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणारे ३३ कचरा प्रकल्प वरील १२ संस्थांमार्फत/व्यावसायिकांमार्फत चालविले जातात.

५.२ संकलीत केलेल्या तथ्यांचे विश्लेषण

सं"ोधकाने पुणे शहरातील पुणे महानगरपलिकेअंतर्गत घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्प नमुना म्हणून निवडले. घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण करणाऱ्या किंवा घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे सामाजिक आणि आर्थिक घटक समजावुन घेण्याचा प्रयत्न सं"ोधकाने केला

आहे. त्यासाठी तथ्य संकलीत करताना पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मुलाखती सं"ोधकाने घेतल्या. घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या व्यावसायिकांकडुन अनुसुची आणि घनकचरा पक्रिया प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या कामगारांकडुन अनुसुची सं"ोधकाने भरून घेतली आणि संकलित तथ्याचे वि"लेषण पुढिल प्रकारे केले.

- **घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांचे सामाजिक विश्लेषण**
- **घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांचे आर्थिक विश्लेषण.**
- **घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांच्या सामाजिक व आर्थिक तथ्यांचा परस्परसंबंध**
- **घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे सामाजिक विश्लेषण**
- **घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे आर्थिक विश्लेषण**
- **घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सामाजिक व आर्थिक तथ्यांचा परस्परसंबंध**

संकलित तथ्यांचे सामाजिक **व** आर्थिक वि"लेषण करताना सं"ोधकांने **३३** घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचा अभ्यास सं"ोधकाने केलेला आहे.

५.२.१ घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया करणाऱ्या कचरा प्रक्रिया प्रकल्पांचे सामाजिक विश्लेषण

पुणे महानगरपालिकेअंतर्गत **३३** कचरा प्रक्रिया प्रकल्प **२००८-२०१४** या कालावधीत कार्यरत होते. **३३** कचरा प्रक्रिया प्रकल्पापैकी अनेक प्रकल्प एकाच संस्थेमार्फत चालविले जातात. त्यामुळे सं"ोधकाने व्यावसायिकांकडुन भरून घतलेल्या अनुसुचीद्वारे संकलित तथ्यांचे

वि"लेषण करताना **३३** कचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये प्रकल्पांच्या मालकीनुसार विभागणी केली आहे. त्यामुळे एकुण **३३** कचरा प्रक्रिया प्रकल्पांचे **१२** व्यावसायिक असा उल्लेख सामाजिक वि"लेषण करताना केलेला आहे.

५.२.१.१ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या व्यावासायिकांच्या वयोरचनेनुसार वर्गीकरण


तक्ता ५.८
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या व्यावसायिकांची वयोरचना

अ.क्र.	वयोगट	व्यावसायिकांची संख्या	टक्केवारी (%)
१	१८ ते २५ वर्षे	–	–
२	२६ ते ३५ वर्षे	०४	३३.३३%
३	३५ ते ४५ वर्षे	०४	३३.३३%
४	४५ वर्षेच्या पुढे	०४	३३.३३%
एकुण		१२	१००%

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

सं"ोधकाने घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या व्यावसायिकांचे वयोरचनेनुसार चार गट केले आहे. **१२** व्यावसायिकांपेकी **१८ ते २५** या वयोगटातील एकही अधिकारी नाही. **२६ ते ३५** वयोगटातील **४** व्यावसायिक आहेत.

आलेख ५.१
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या व्यावसायिकांची वयोरचना



३५ ते ४५ आणि **४५** च्या पुढील वयोगटातील प्रत्येकी **४** व्यावसायिक आहेत. म्हणजेच घनकचरा प्रक्रिया प्रकल्प हे व्यवसायाचे उत्तम साधन होऊ शकते हा दृष्टीकोन वयाच्या **२५** वर्षानंतर विकसीत होणाऱ्या व्यावसयिकांची संख्या जास्त आहे. सामाजिक भान आणि स्वतःला आणि कुटुंबाला आर्थिक दृष्टया बळकट करण्यासाठी घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यवसाय म्हणून निवडणारे **२६** वर्षांपासुन **५२** वर्षापर्यत या वयोगटातले व्यावसायिक आहेत. (तक्ता क्र **५.८** आणि आलेख **५.१** पहा)

५.२.१.२ घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांची लिंगरचनेनुसार वर्गीकरण

पुणे महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविण्याऱ्या **१२** व्यावसयिकांपैकी **१** स्त्री व्यावसायिक व **११** पुरूष व्यावसायिक आहेत. म्हणजेच घनकचऱ्यापासुन वस्तुंची पुर्ननिर्मिती हा व्यवसाय होऊ "ाकतो हा दृष्टिकोन स्त्री व्यावसायिकांमध्ये अधिक विकसित झाला पाहिजे. कदाचित घनकचऱ्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन नकारात्मक असल्याने स्त्री व्यावसायिक या व्यवसायाकडे येण्याची संख्या कमी दिसुन येते. (तक्ता **५.९** आणि आलेख क्र **५.२** पहा)


तक्ता क्र ५.९
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांची लिंग रचना

अ.क्र.	स्त्री–पुरूष	स्त्री	पुरूश	एकूण
१	व्यावसायिक	०१	११	१२
२	टक्केवारी (%)	८.३३ %	९१.६६ %	१०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख ५.२

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांची लिंग रचना



५.२.१.३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांची वैवाहिकस्थितीनुसार वर्गीकरण

तक्ता क्र ५.१०
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांची वैवाहिक स्थिती

अ.क्र.	वैवाहिक स्थिती	विवाहित	अविवाहित	एकुण
१	व्यावसायिक	१२	-	१२
२	टक्केवारी (%)	१०० %	–	१०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावासायिकांपैकी सर्व व्यावसायिक विवाहित आहेत. (तक्ता क्र **५.१०** पहा)

५.२.१.४ पुणे महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांचे धर्मानुसार केलेले वर्गीकरण


तक्ता क्र ५.११
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांचे धर्मानुसार वर्गीकरण

धर्म	व्यावसायिकांची संख्या	टक्केवारी
हिंदु	१०	८३.३३ %
मुस्लीम	०१	०८.३३ %
पार"ी	-	००.०० %
ख्रि"चन	-	००.०० %
बौध्द	-	००.०० %
जैन	०१	०८.३३ %
एकुण	१२	१०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

पुणे महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या १२ व्यावसायिकांपैकी १ मुस्लीम, १० हिंदु, व १ व्यावसायिक जैन धर्मातील आहेत. म्हणजेच हिंदु धर्माव्यतिरिक्त इतर धर्मामध्ये ही घनकचरा प्रकल्प व्यावसायाची माहिती विकसीत होणे गरजेचे आहे. (तक्ता क्र ५. ११ आणि आलेख क्र ५.३ पहा)

आलेख ५.३
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांचे धर्मानुसार वर्गीकरण



५.२.१.५ पुणे महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांचे शिक्षणानुसार केलेले वर्गीकरण

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या १२ व्यावसायिकांपैकी ०९ व्यावसायिकांनी व्यावसायिक अभ्यासक्रम पुणे केलेला आहे. उर्वरित ३ व्यावसायिकांनी पदवीपर्यंतचे शिक्षण मान्यवर विदयापिठामध्ये पुर्ण केलेले आहे. (तक्ता क्र ५.१२ आलेख ५.४ पहा)


तक्ता क्र ५.१२
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांचे शिक्षणानुसार वर्गीकरण

शिक्षण	व्यावसायिकांची संख्या	टक्केवारी
१० वी	–	0.00 %
१२ वी	–	0.00 %
पदवी	०३	२५.०० %
व्यावसायिक अभ्यासक्रम	०९	७५.०० %
एकुण	१२	१०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख ५.४

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या व्यावसायिकांचे शिक्षणानुसार वर्गीकरण



५.२.१.६ पुणे महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या नोंदणीचे वर्गीकरण

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या **१२** घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी सर्वच घनकचरा प्रक्रिया प्रकल्प नोंदणीकृत आहेत. (तक्ता क्र **५.१३** आणि आलेख **५.४** पहा)

तक्ता क्र ५.१३

पुणे महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या नोंदणीचे वर्गीकरण

नोंदणी झालेले घनकचरा प्रक्रिया प्रकल्प	नोंदणी न झालेले घनकचरा प्रक्रिया प्रकल्प	एकुण

१२ (१००%)	– (0.00%)	१२ (१००%)

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.२.१.७ पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे स्वरूपानुसार केलेल वर्गीकरण


पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी **१०** कचरा प्रक्रिया प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेड आहेत. **१** पार्टनरशीप संस्था आहे. आणि **१** प्रोप्रायटरशीप आहे.(तक्ता क्र **५.१४** आणि आलेख **५.५** पहा)

तक्ता क्र ५.१४
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे स्वरूपानुसार वर्गीकरण

स्वरूप	घनकचरा प्रकल्पांची संख्या	टक्केवारी
प्रायव्हेट लिमिटेड	१०	८३.३३%
पार्टनर"ीप	०१	०८.३३%
प्रोप्रायटर"ीप	०१	०८.३३%
एकुण	१२	१०० %

(संदर्भ– प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख ५.५
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे स्वरूपानुसार वर्गीकरण



५.२.१.८ पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे स्थापनेनुसार केलेल वर्गीकरण

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या ३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी ०६ प्रकल्प २००८ मध्ये, २००९ मध्ये ३ प्रकल्प, २०१० मध्ये ७ प्रकल्प, २०११ मध्ये १ प्रकल्प, २०१२ मध्ये २ प्रकल्प, आणि अनुक्रमे २०१३ मध्ये ६ प्रकल्प आणि २०१४ मध्ये ७ कचरा प्रक्रिया प्रकल्प पुणे महानगरपालिकेअंतर्गत सुरू करण्यात आले. म्हणजेच गेल्या ५ वर्षामध्ये घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची संख्या वेगाने वाढताना दिसुन येते. २००८ मध्ये बायोगॅस प्रकल्प ४ होते २०१४ मध्ये पुणे महानगरपालिकेअंतगत १२ बायोगॅस प्रकल्प कार्यरत आहेत. मेकॅनिकल कंपोस्टींगचे ६ प्रकल्प कार्यरत आहेत. बायोगॅस आणि मेकॅनिकल कंपोस्ट चे हे प्रकल्प प्रोसेसिंग प्रकल्प आहेत. गांडुळखत चे ३ प्रकल्प वीजनिर्मितीचा एक प्रकल्प आणि

घनकचऱ्यापासुन विविध वस्तुंचे उत्पादन करणारा एक प्रकल्प असे ५ प्रकल्प स्वतः भांडवल गुंतवणुक करून घनकचऱ्यापासुन उत्पादित वस्तुंची विक्री करतात बायोगॅस आणि मेकॅनिकल कंपोस्टिंग प्रकल्पांमध्ये घनकचऱ्यापासुन होणाऱ्या उत्पादनावर पुणे महानगरपालिकेचा अधिकार आहे. कारण या प्रकल्पामध्ये भांडवल गुंतवणुक पुणे महानगरपलिकेने केली आह.(तक्ता क्र ५. १५ आणि आलेख ५.६ पहा)


घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे व्यावसायिक १२ असले तरी एकाच व्यावसायिकांच्या संस्थेअंतर्गत अनेक प्रकल्प सुरू आहेत. या प्रत्येक प्लॅन्टची विभागणी वेगवेगळया वर्षी करण्यात आली आहे. त्यामुळे स्थापनेचा कालावधी लक्षात घेताना सं"ोधकाने पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत ३३ प्रकल्पांचा आढावा घेतलेला आहे.

तक्ता क्र ५.१५
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे स्थापनेनुसार केलेल वर्गीकरण

वर्ष	घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची संख्या	वीजनिर्मिती प्रकल्प	विविधवस्तुंचेउत्पादन करणारे प्रकल्प	गांडुळखत प्रकल्प	बायोगॅस प्रकल्प	मेकॅनिकल कंपोस्ट
२००८	०६	–	०१	–	०४	०१
२००९	०३	–	–	–	०३	–
२०१०	०७	०१	–	०२	०४	–
२०११	०१	–	–	०१	–	–
२०१२	०३	–	–	–	०२	०१
२०१३	०६	–	–	–	०५	०१
२०१४	०७	–	–	–	०४	०३
एकुण	३३	०१	०१	०३	२२	०६

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख ५.६
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे स्थापनेनुसार वर्गीकरण



५.२.१.९ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी वापरलेल्या जागेच्या मालकीनुसार वर्गीकरण

घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांसाठी पुणे महानगरपालिकेने सर्व ३३ (१००%) कचरा प्रक्रिया प्रकल्पांसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. व्यावसायिकांना स्वतः जागा विकत किंवा भाडयाने घेण्याची गरज नाही. घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांसाठी जागा महानगरपालिका उपलब्ध करून देते म्हणजेच ज्या तरूणांना व्यावसायिक बनायचे आहे. परंतु जागेची अडचण आहे असे नवतरूण घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यवसाय म्हणुन निवडु शकतात.(तक्ता क्र ५.१६ पहा)

तक्ता क्र ५.१६
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी वापरलेल्या जागेचा मालकी

अ.क्र.	जागेची मालकी	घनकचराप्रक्रिया प्रकल्पांची संख्या	टक्केवारी
१	स्वतःची	–	०.००
२	भाडयाची	–	०.००
३	महानगरपालिकेची	३३	१००
एकुण		**३३**	**१००**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.२.१.१० घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे करारानुसार वर्गीकरण

तक्ता क्र ५.१७
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे करारानुसार वर्गीकरण


अ.क्र.	कराराचा कालावधी	घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची संख्या	टक्केवारी(%)
१	५ वर्षे	३१	९३.९३%
२	१० वर्षे	–	०.००
३	२० वर्षे	–	०.००
४	३० वर्षे	०२	०६.०६%
एकुण		**३३**	**१००%**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी ३१ (९३.९३%) घनकचरा प्रकल्पांबरोबर पुणे महानगरपालिका दर ५ वर्षांचा करार करते २(०६.०६%) घनकचरा प्रकल्पांबरोबर पुणे महानगरपालिकेने **३०** वर्षांचा करार केलेला आहे. कारण या **२** घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांसाठी यंत्रसामुग्री व स्थिर भांडवल व्यावसायिकांनी स्वतः गुंतविलेले आहे. त्यामुळे एवढया मोठया प्रमाणात गुंतवणुक करणाऱ्या व्यावसायिकांना सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने **३०** वर्षांचा करार केलेला आहे. ज्या ३१ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांबरोबर ५

वर्षांचा करार आहे. त्या ठिकाणी यंत्रसामुग्री स्थिर भांडवल पुणे महानगपालिकेचे स्वतःचे आहे. (तक्ता क्र ५.१७ आणि आलेख **५.७** पहा)

आलेख ५.७
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे करारानुसार वर्गीकरण




५.२.१.११ घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांतुन निर्माण रोजगारसंधीचे वर्गीकरण


२००८ पासुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये रोजगारसंधी निर्माण होत गेल्या **२०१४** पर्यंतच्या पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत **३३** घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये **९३४** कामगार कार्य करतात त्यापैकी **६५** अधिकारी पदावर व **८६९** कामगार वर्ग आहे. सं"ोधकांने प्रतिवर्षी वाढलेल्या रोजगारसधी विचारात घेतल्या आहेत. **२००८** मध्ये **०९** अधिकारी आणि **१२६**

कामगार वर्गांचे प्रमाण दरवर्षी वाढत गेलेले दिसुन येते. **२०१४** मध्ये अजुन **४** अधिकारी आणि २१ कामगार कामावर घेतले गेल्यानंतर घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांचे एकुण प्रक्रिया प्रकल्पात पर्यंत वाढलेले दिसुन येते. घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांच्या या १२ संस्थांकडुन ९३४ लोकांना रोजगार उपलब्ध झालेला दिसुन येतो. त्यामध्ये कामगार ८६९ आाणि अधिकारी ६५ आहेत. (तक्ता क्र ५.१८, आलेख **५.८** आणि आलेख **५.९** पहा)

आलेख ५.८
रोजगार उपलब्ध झालेले कामगार



आलेख ५.९
रोजगार उपलब्ध झालेले अधिकारी



तक्ता क्र ५.१८
घनकचरा पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांपासुन निर्माण होणाऱ्या रोजगारसंधीचे वर्गीकरण

वर्ष	घनकचराप्रक्रिया प्रकल्पामधुन झालेला एकुण रोजगार		वीजनिर्मिती प्रकल्प		विविध वस्तुंचे उत्पादन करणारे प्रकल्प		गांडुळखत प्रकल्प		बायोगॅस प्रकल्प		मेकॅनिकल कंपोस्ट प्रकल्प	
	अधिकारी	कामगार	अधिकारी	कामगार	अधिकारी	कामगार	अधिकारी	कामगार	अधिकारी	कामगार	अधिकारी	कामग
२००८	०९	१२६	–	–	०५	१००	–	–	०३	२०	०१	०६
२००९	०९	१५९	–	–	०६	१५०	–	–	०३	०९	–	–
२०१०	१३	३३२	०४	०६	०३	३००	०१	०४	०५	१४	–	–
२०११	११	११६	०५	०६	०५	९०	०१	०८	–	–	–	–
२०१२	१०	७६	०६	०८	०१	६०	–	०६	०२	०७	०१	०१
२०१३	०९	३९	०५	०८	–	–	–	०७	०३	२४	०१	०७
२०१४	०४	२१	–	–	–	–	–	०५	०३	१६	०१	०५
एकुण	६५	८६९	२०	३०	२०	७००	०२	३०	१९	९०	०४	१९
	९३४		५०		७२०		३२		१०९		२३	

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.२.१.१२ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपासुन होणारे पर्यावरण रक्षण/पर्यावरण समतोलाचे वर्गीकरण

तक्ता क्र. ५.१९
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपासुन होणारे पर्यावरण रक्षण/पर्यावरण समतोलाचे वर्गीकरण

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यावरणपुरक आहेत	घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यावरणपुरक नाहित	एकुण
१२	–	१२
१०० %	०.०० %	१०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणाऱ्या १२ व्यावसायिकांनुसार घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यावरण रक्षक आहे. घनकचऱ्याचा मोकळया जागेत निचरा केल्याने जमिनीचा कस /स्तर मानवाच्या वापरायोग्य राहत नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीचा प्र"न अधिकाधिक बिकट

होत चालेला आहे. घनकचऱ्याच्या पुन:"चक्रीकरण प्रक्रियेमुळे कचऱ्याचा निचरा करण्यासाठी जमिनीचा प्र"न सुटतो. दुर्मिळ साधनसंपत्तीचा पुनर्वापर होतो. कचऱ्याचे ज्वलन केल्याने निर्माण होणारा मिथेन वायु बायोगॅस निर्माण करण्यासाठी वापरला जातो. त्यामुळे वीजनिर्मिती होते. कंपोस्ट, गांडुळखत तयार होते. ते शेती क्षेत्राला उपयुक्त ठरते.(तक्ता क्र. ५.१९ पहा)


५.२.१.१३ घनकचऱ्याची विभागणी योग्य प्रकारे (ओला कचरा/सुका कचरा) होणाऱ्या गरजेनुसार वर्गीकरण

तक्ता क्र. ५.२०
घनकचऱ्याचे वर्गीकरण

घनकचऱ्याचे वर्गीकरण करणे आवश्यक असणारे कचरा प्रकल्प	घनकचऱ्याचे वर्गीकरण नसले तरी चालणारे कचरा प्रकल्प	एकुण
३१	०२	३३
(९३.९३%)	(०६.०६%)	(१००%)

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख क्र. ५.१०
घनकचऱ्याचे वर्गीकरण



३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी **२(**६.०६%) प्रकल्पांकडे वर्गीकृत न झालेला कचरा वापरून पुर्नउत्पादन करण्याची यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. परंतु या यंत्रसामुग्रीसाठी या व्यावसायिकांनी स्वतः गुंतवणुक केली आहे. पुणे महानगरपालिकेने स्थिर भांडवलांची गुंतवणुक केलेल्या ३१ प्रकल्पांना (९३.९३%) ओला कचरा आणि सुका कचरा हे वर्गीकरण पुर्नउत्पादनासाठी आव"यक आहे.(तक्ता क्र **५.२०** आणि आलेख **५.१०** पहा)

५.२.१.१४ नवतरूणांसाठी/व्यावसायिकांसाठी घनकच-याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया उत्तम व्यवसाय ठरण्याच्या दृष्टीकोनाचे वर्गीकरण

३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातील व्यावसायिकांपेकी १२ ही व्यावसायिकांच्या मते (१००%) हा उत्तम व्यवसाय आहे. अधिकाधिक नवतरूणांनी व्यवसाय म्हणुन हे क्षेत्र निवडावे असे मत घनकचरा प्रकल्प व्यावसायिकांनी व्यक्त केले.(तक्ता क्र. ५.२१ पहा)

तक्ता क्र ५.२१
नवतरूण व्यावसायिकांनी घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यवसाय म्हणुन स्विकारण्याच्या दृष्टिकोनाचे वर्गीकरण

दृष्टीकोन	घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यावसायिकांचे मत	टक्केवारी (%)
सकारात्मक	१२	१०० %
नकारात्मक	–	–
एकुण	**१२**	**१०० %**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.२.१.१५ – कामगारांना व्यावसायिकांकडुन/महानगरपालिकेकडुन दिल्या जाणा-या सोयी–सुविधांचे वर्गीकरण

घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये काम करणा-या कामगारांना आरोग्यविषयक सुविधा पुरविणे गरजेचे आहे. पुणे महानगरपालिका आणि व्यावसायिक मिळून हॅन्डग्लोज, मास्क, ॲप्रन, टॅबलेट्स इ. सुविधा त्यांना पुरविताना दिसतात.

तक्ता क्र ५.२२

कामगारांना व्यावसायिकांकडुन/महानगरपालिकेकडुन दिल्या जाणाऱ्या सोयी–सुविधांचेवर्गीकरण

अ.क्र.	कामगारांना मिळणाऱ्या सोयी सुविधा	होय	नाही	एकुण
१	आरोग्य विषयक सुविधा हॅन्डग्लोज, मास्क, टॅबलेटस इ.	१२ (१००%)	– (०.००%)	१२ (१००%)
२	राहण्याची सोय	०२ (६.०६%)	१० (८३.३३%)	१२ (१००%)
३	मेडिक्लेम	०८ (६६.६६%)	०४ (३३.३३%)	१२ (१००%)
४	गॅस, वीज, पिण्याचे पाणी	०१ (१८.३३%)	११ (९१.६६%)	१२ (१००%)

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

मेडिक्लेमची सुविधा **०८** (६६.६६%) व्यावसायिकांनी उपलब्ध करून दिलेली आहे. **०२** (६.०६%) व्यावसायिकांनी राहण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. एका घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातर्फे (८.३३%) काम करणाऱ्या कामगारांनी मोफत वीज गॅस, पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जाते हे नक्कीच कौतुकास्पद आहे. (तक्ता क्र ५.२२ पहा)

५.२.१.१६ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातुन निर्माण होणाऱ्या वस्तुंचा विक्रीचे/वापराचे अधिकार यानुसार वर्गीकरण

घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांतुन निर्माण होणाऱ्या वस्तु पुणे महानगरपालिका वापरते/ विक्री करते की घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांचे व्यावसायिक या वस्तुंचा वापर किंवा विक्री करू शकतात हे पाहण्यासाठी वस्तु विक्रीच्या/ वापराच्या अधिकारांचे वर्गीकरण केले.

तक्ता क्र ५.२३

घनकचऱ्यापासुन उत्पादित वस्तुंच्या वापराचे/विक्रीचे अधिकारानुसार वर्गीकरण


अ.क्र.	विक्री/वापर करण्याचा अधिकार	घनकचरा प्रकल्पाची संख्या	टक्केवारी
१	पुणे महानगरपालिका	२८	८४.८४ %
२	घनकचरा प्रक्रिया प्रकल्प	०५	१५.१५ %
एकुण		**३३**	**१०० %**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

२८ घनकचरा प्रकल्पांमध्ये ८४.८४% निर्माण होणाऱ्या पुनर्उत्पादित वस्तुंचा वापर पुणे महानगरपालिका करते. त्यामध्ये बायोगॅस पासुन वीजनिर्मिती करणारे **२२** घनकचरा प्रकल्प आहेत. या वीजेचा वापर पुणे महानगरपालिका रस्त्यावरील दिव्यांसाठी, सार्वजनीक उदयानांसाठी, महानगरपालिका कार्यालयासाठी करताना दिसते. **०६** मेकॅनिकल कंपोस्ट चे प्रकल्प आहेत. या खताचा वापर पुणे महानगरपालिकेच्या उदयानांसाठी व रस्त्याच्या मध्ये दुभाजकांवर सु"ोभिकरणांसाठी लावलेल्या झाडांसाठी वापरते. या 28 घनकचरा प्रकल्पांसाठी पुणे महानगरपालिकेने स्थिर भांडवल गुंतवलेले आहे. यंत्रसामुग्री खरेदी केलेली आहे. त्यामुळे **२८** घनकचरा प्रकल्पांमध्ये निर्माण होणाऱ्या पुनर्उत्पादित वस्तु महानगरपालिका वापरते. **०५** घनकचरा प्रक्रिया प्रकल्प १५.१५% घनकचरा पासुन निर्माण झालेल्या पुनर्उत्पादित वस्तुंची विक्री/वापर करतात.(तक्ता क्र ५.२३ आणि आलेख **५.११** पहा)

आलेख क्र ५.११

वस्तुंच्या विक्रीचे / वापराचे अधिकार



५.२.१.१७ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये निर्माण होणाऱ्या वस्तुंच्या विक्रीसाठी जाहिरात माध्यमाच्या वापराचे वर्गीकरण

तक्ता क्र ५.२४


घनकचऱ्यापासुन पुर्नउत्पादित वस्तुंच्या जाहिरातीच्या वापरांचे वर्गीकरण

जाहिरातीचा वापर करणारे घनकचरा प्रकल्प	जाहिरातीचा वापर न करणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प	एकुण
०४ १२.१२ %	२९ ८७.८७ %	३३ १०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी **०४** (१२.१२ %) घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कचऱ्यापासुन उत्पादित वस्तुच्या विक्रीसाठी जाहिरात या माध्यमाचा वापर करतात. तर उर्वरित **२९** घनकचरा प्रक्रिया प्रकल्प (८७.८७ %)जाहिरातीचा वापर करत नाहीत.(तक्ता क्रमांक **५.२४** आणि आलेख **५.१२** पहा)

आलेख क्र ५.१२
घनकचऱ्यापासुन पुर्नउत्पादित वस्तुंच्या जाहिरातीच्या वापरांचे वर्गीकरण



तक्ता क्र ५.२५
घनकचऱ्यापासुन पुर्नउत्पादित वस्तुंच्या जाहिरातीसाठी वापरले जाणारे माध्यम

अ.क्र	जाहिरातीचे माध्यम	माध्यमाचा वापर करणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प
१	माहितीपत्रक	०४
२	वर्तमानपत्र	०१
३	टि.व्ही.	–
४	रेडिओ	–

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी **४** (१२.१२ %) घनकचरा प्रकल्प करतात त्यापैकी माहितीपत्रक या जाहिरात माध्यमांचा वापर चारही घनकचरा प्रक्रिया प्रकल्प करताना दिसतात एक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प माहितीपत्रक आणि वर्तमानपत्र या दोन्ही माध्यमांचा वापर करतो. (तक्ता क्र **५.२५** पहा)

५.२.१.१८ पुणे महानगरपालिकेकडुन मिळणाऱ्या सहकार्याबाबत घनकचरा प्रकल्प व्यावसायिकांचे मत

तक्ता क्र ५.२६
सहकार्याबाबत घनकचरा प्रकल्प व्यावसायिकांचे मत

अ.क्र.	पुणेमहानगरपालिकेच्या सहकार्याबाबत मत	घनकचराप्रकल्प व्यावसायिकांची संख्या	टक्केवारी
१	समाधानी	१२	१०० %
२	असमाधानी	–	०.०० %
एकुण		**१२**	**१०० %**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी सर्वच **१२** व्यावसायिक (१००%) पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याबाबत समाधानी आहेत.(तक्ता क्र **५.२६** पहा)

५.२.१.१९ कचऱ्यातुन सोने या उक्तीबद्दलचे घनकचरा प्रकल्प व व्यावसायिकांचे मत

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या **३३** घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातील **१२** ही व्यावसायिकांच्या मते (१००%) कचऱ्यातुन सोने ही उक्ती सत्य आहे. घनकचऱ्याच्या पुनः"चक्रीकरणातुन प्रक्रियेतुन खरच दुर्मिळ साधनसंपत्तीचा पुनर्वापर होतो. पर्यावरणाचा समतोल साध्य होतो. घनकचरा प्रक्रियेतुन वीजनिर्मिती, एल.पी.जी. गॅस, खतनिर्मिती, कोळ"ाला पर्याय ठरणारे चारकोल निर्माण होते. त्यामुळे कचऱ्यापासुन सोने ही उक्ती सर्वच घनकचरा प्रकल्प व्यावसायिक मान्य करतात(तक्ता क्र **५.२७** पहा)

तक्ता क्र ५.२७
कचऱ्यातुन सोने या उक्तीबद्दलचे घनकचरा प्रकल्प व व्यावसायिकांचे मत

अ.क्र.	कचऱ्यापासुन सोने या उक्तीबद्दल मत	घनकचराप्रक्रिया प्रकल्प व्यावसायिकांची संख्या	टक्केवारी
१	सत्य	१२	१०० %
२	असत्य	–	–
एकुण		**१२**	**१०० %**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

५.२.१.२० घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यावसायिकांचे सामाजिक प्रतिष्ठेबद्दलचे मत

तक्ता क्र ५.२८
घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यावसायिकांचे सामाजिक प्रतिष्ठेबददल मत

अ.क्र.	सामाजिक प्रतिष्ठेबद्दलचे मत	घनकचराप्रकल्प व्यावसायिकांची संख्या	टक्केवारी
१	सामाजिक प्रतिष्ठा उंचावली	१२	१०० %
२	सामाजिक प्रतिष्ठेला धक्का	–	०.०० %
एकुण		**१२**	**१०० %**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यान्वित **१२** (१००%) घनकचरा प्रकल्प व्यावसायिकांच्या मते घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण व्यवसाय हा प्रतिष्ठेला धक्का बसला नसुन याउलट त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा उंचावली आहे. कारण त्यांनी जरी हा व्यवसाय म्हणुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू केला असला तरी असे प्रकल्प ही काळाची, पर्यावरणाची गरज आहेत. (तक्ता क्र ५.२८पहा)

५.२.२ घनकचऱ्याचे पुनःश्चक्रीकरण प्रक्रिया प्रकल्पांचे आर्थिक विश्लेषण

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या **३३** घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये घनकचऱ्याचे पुनः"चक्रीकरण प्रक्रिया करून R.D.F., चारकोल, बायोडिझेल, बायोगॅस, खतनिर्मिती अ"ा विविध वस्तुची निर्मिती होते. घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व्यवसाय म्हणुन फायदे"ीर ठरतात का, रोजगार संधी वाढवतात का? हे शोधुन काढण्यासाठी स"ोधकाने संकलित केलेल्या तथ्यांचे आर्थिक वि"लेषण केले.

५.२.२.१ – घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमधुन निर्माण होणाऱ्या वस्तुंचे वर्गीकरण

तक्ता ५.२९


घनकचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये निर्माण होणाऱ्या मुख्य वस्तुंनुसार प्रकल्पांचे वर्गीकरण

अ.क्र.	घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात निर्माण होणारी मुख्य वस्तु	घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची संख्या	टक्केवारी %
१	वीजनिर्मिती	०१	०३.०३
२	विविध वस्तुंचे उत्पादन करणारे प्रक्रिया प्रकल्प (चारकोल, कंपोस्ट,बायोडिझेल)	०१	०३.०३
३	गांडुळखत प्रकल्प	०३	०९.०९
४	बायोगॅस प्रकल्प	२२	६६.६६
५	मेकॅनिकल कंपोस्ट	०६	१८.१८
एकुण		३३	१०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख ५.१३

घनकचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये निर्माण होणाऱ्या मुख्य वस्तुंनुसार प्रकल्पांचे वर्गीकरण



पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत ३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये एक वीजनिर्मिती प्रकल्प आहे. १ प्रकल्प विविध वस्तुंचे उत्पादन घनकचऱ्यापासुन करतो. त्यामध्ये बायोडिझेल, R.D.F.,चारकोल, कंपोस्ट या वस्तुंचा समावे"ा होतो. २२ बायोगॅस प्रकल्पांपासुन वीजनिर्मिती

होते. त्याबरोबर या प्रक्रियेत तयार होणारी अॅ"ा ही सिमेंट उत्पादक विकत घेतात. ३ गांडुळखत प्रकल्प आणि ६ मेकॅनिकल कंपोस्टींगचे उत्पादन करणारे प्रकल्प आहेत. हे निर्माण होणारे खत पुणे महानगरपालिकेचो उदयाने रस्त्यावरची झाडे यांना वापरले जाते. त्याचप्रमाणे शेतीक्षेत्राला विक्री ही केली जाते. (तक्ता क्र ५.२९ आणि आलेख क्र ५.१३ पहा)

५.२.२.२ – पुणे महानगरपालिकेकडुन टिपिंग फी मिळणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प

पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्य करणाऱ्या ३३ घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी ५ प्रकल्पांना पुणे महानगरपालिकेतर्फे टिपिंग फी मिळते. या ५ प्रकल्पांनी स्वतः भांडवल गुंतवणुक केली असल्याने घनकचऱ्यापासुन उत्पादित वस्तुंची विक्री करण्याचा अधिकार त्यांना आहे. ५ प्रकल्पांपैकी १ वीजनिर्मिती प्रकल्प आहे. त्यास ३०० रू प्रति मे.टन घनकचऱ्यामागे टिपिंग फी मिळते. ३ गांडुळखत प्रकल्पांना ६० रू. १ मे.टन घनकचऱ्यामागे टिपिंग फी मिळते. आणि विविध वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या एका प्रकल्पांला ५८ रूपये १ मे.टन घनकचऱ्यामागे टिपिंग फी मिळते.हे प्रमाण २००८ पासुन कायम आहे (तक्ता क्र ५.३० आलेख ५.१४ पहा)


तक्ता क्र ५.३०
पुणे महानगरपालिकेकडुन टिपिंग फी मिळणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प (२०१४ नुसार)

अ.क्र.	टिपिंग फी रू	घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची संख्या	टक्केवारी
१	५८ रू	०१	०३.०३ %
२	६० रू	०३	०९.०९ %
३	३०० रू	०१	०३.०३ %
	टिपिंग फी मिळत नाही	२८	८४.८४ %
एकुण		**३३**	१०० %

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख क्र ५.१४

पुणे महानगरपालिकेकडुन टिपिंग फी मिळणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प (२०१४ नुसार)



५.२.२.३ – पुणे महानगरपालिकेकडुन प्रोसेसिंग फी मिळणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प


पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यान्वित **३३** घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांपैकी **२८** घनकचरा प्रकल्पांना (८४.८४ %) प्रोसेसिंग फी मिळते त्यामध्ये **२२**(६६.६६ %) बायोगॅस प्रकल्प व **६** मेकॅनिकल (१८.१८ %) कंपोस्टींग चे प्रकल्प आहेत. ज्या **२८** घनकचरा प्रकल्पांना (८४.८४ %) प्रोसेसिंग फी दिली जाते. त्या प्रकल्पामध्ये पुणे महानगरपालिकेने स्थिर भांडवल व यंत्रसामुग्रीची गुंतवणुक केलेली आहे. त्यामुळे या व्यावसायिकांना प्रोसेसिंग प्रक्रियेसाठी पुणे महानगरपालिका पैसे देते.

तक्ता क्र. ५.३१
पुणे महानगरपालिकेकडुन प्रोसेसिंग फी मिळणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प(२०१४ नुसार)

अ.क्र.	प्रोसेसिंग फी रू.	घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची संख्या	टक्केवारी
१	१ लाख १० हजार	०६	१२.१२ %
२	१ लाख १५ हजार	२२	६६.६६ %
३	प्रोसेसिंग फी मिळत नाही	०५	१५.१५ %
एकुण		**३३**	**१०० %**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख क्र ५.१५
पुणे महानगरपालिकेकडुन प्रोसेसिंग फी मिळणारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प



ज्या **५** (१५.१५%) घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांना टिपिंग फी मिळते त्यांना प्रोसेसिंग फी जात नाही. उर्वरीत **२८** (८४.८४ %) घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांना प्रोसेसिंग फी मिळते. त्यापैकी **२२** (६६.६६%) घनकचरा प्रक्रिया प्रकल्प बायोगॅस प्लॅन्ट आहेत. व उर्वरीत **०६** (१८.१८ %)मेकॅनिकल कंपोस्ट आहेत. पुणे महानगरपालिकेअंतर्गत **३३** घनकचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यरत आहेत. त्यापैकी **२८** प्रक्रिया प्रकल्प केवळ प्रोसेसिंग प्रकल्प एका महिन्यात प्रक्रिया केल्यास पुणे महानगरपालिकेअंतर्गत त्यांना प्रोसेसिंग फी मिळते. **२०१२ -१३** पर्यत बायोगॅस प्रकल्पांना **५७,०००** रूपये प्रोसेसिंग फी **१२०** मे. टन घनकचरा प्रोसेस केल्यानंतर मिळत होती. मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पांना **९८०००** रू. प्रोसेसिंग फी **२०१२-१३** पर्यत मिळत होती. **२०१३-१४** पासुन प्रोसेसिंग फी वाढवण्यात आली आहे. प्रतिमहिना **१५०** मे. टन घनकचरा प्रोसेस केल्यास

बायोगॅस प्लॅन्टला १ लाख १५ हजार रू. आणि मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पांना १ लाख १० हजार रू. प्रोसेसिंग फी मिळते. (तक्ता क्र ५.३१ आणि आलेख ५.१५ पहा)

५.२.२.४ – घनकचरा वीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

तक्ता क्र ५.३२

घनकचरा वीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

वर्ष	प्रतिवर्शी अधिकारी वर्ग संख्या	प्रतिवर्शी कामगार वर्ग संख्या	अधिकारी वर्गाचे वेतन(रु)	कामगार वर्गाचे वेतन(रु)	एकुण वेतनखर्च(रू) (प्रतिमहिना)	एकुण वेतनखर्च (रु)(प्रतिवर्शी)
२०१०	०४	०८	८०,०००	८०,०००	१,६०,०००	१९,२०,०००
२०११	०९	१४	१,८०,०००	१,४०,०००	३,२०,०००	३८,४०,०००
२०१२	१५	२२	३,००,०००	२,२०,०००	५,२०,०००	६४,४०,०००
२०१३	२०	३०	४,००,०००	३,००,०००	७,००,०००	८४,००,०००
२०१४	२०	३०	४,००,०००	३,००,०००	७,००,०००	८४,००,०००

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

वीजनर्मिती घनकचरा प्रकल्प २०१० मध्ये सुरू करण्यात आला वीजनिर्मिती करणारा हा पर्यावरणपुरक प्रकल्प आहे. कचऱ्यापासुन वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पामध्ये मिथेन वायू तयार केला जातो आणि वायूपासुन वीजनिर्मिती तयार केली जाते. कोणत्याही प्रदुषणाविवाय कचऱ्यापासुन वीज निर्माण करण्याचा प्रयत्न या प्रकल्पांद्वारे केला जात आहे. २०१० पासुन २०१४ पर्यत वीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये रोजगारसंधी वाढतच गेल्याचे दिसुन येते. २०१० मध्ये ०४ आधिकारी आणि ८ कामगार या प्रकल्पामध्ये कार्यरत होते. हे प्रमाण २०१४ पर्यंत २० अधिकारी आणि ३० कामगार असे वाढले रोजगार संख्येत वाढ झाल्याने वेतनखर्च ही वाढल्याचे

दिसुन येते. २०१० मध्ये १९ लाख २० हजार इतका वेतन खर्च होतो हे प्रमाण २०१४ मध्ये ८४ लाखापर्यत वाढलेले दिसुन येते. (तक्ता क्र ५.३२पहा)

५.२.२.५ विविध वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

तक्ता क्र ५.३३
विविध वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

वर्शे	अधिकारीवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	कामगारवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	अधिकारी वर्गाचे वेतन(रु)	कामगार वर्गाचे वेतन(रु)	एकुण वेतनखर्च(रु) (प्रतिमहिना)	एकुण वेतनखर्च(रु) (प्रतिवर्शी)
२००८	०५	१००	१,५०,०००	९,००,०००	१०,५०,०००	१,२६,००,०००
२००९	११	२५०	३,३०,०००	२२,५०,०००	२५,८०,०००	३,०९,६०,०००
२०१०	१४	५५०	४,२०,०००	४९,५०,०००	५३,७०,०००	६,४४,४०,०००
२०११	१९	६४०	५,७०,०००	५७,६०,०००	६३,३०,०००	७,५९,६०,०००
२०१२	२०	७००	६,००,०००	६३,००,०००	६९,००,०००	८,२८,००,०००
२०१३	२०	७००	६,००,०००	६३,००,०००	६९,००,०००	८,२८,००,०००

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

विविध वस्तुंचे उत्पादन करणारा घनकचरा प्रक्रिया प्रकल्प २००८ मध्ये सुरू झाला या प्रकल्पांअंतर्गत R.D.F.,चारकोल, बायोडिझेल, कंपोस्ट अ"ा वस्तु कचऱ्यापासुन निर्माण होऊ लागल्या. अविघटित कचरा बाजुला काढुन त्यापासुन ब्रिक्स(वीट) तयार केली जाते आणि इंधनाला पर्याय म्हणुन आर.डी.एफ. कोळशाला पर्याय म्हणून वापरले जाते. कचऱ्याचे ज्वलन होवुन राहिलेली राख म्हणजे चारकोल होय. चारकोलचे गोळे बनवुन ज्वलनासाठी वापरले जाते.

कचरा विशेषतः प्लॅस्टिक विशिष्ट तापमानास तापवुन त्यापासुन निर्माण होणारे लिक्वीड फिल्टर करून बायोडिझेल किंवा बायोपेट्रोल तयार केले जाते.

या प्रकल्पाने मोठया प्रमाणात रोजगारसंधी निर्माण केल्या **२००८** मध्ये या प्रकल्पाअंतर्गत **१००** कामगार आणि **५** अधिकारी कार्यरत होते. या वर्षात या प्रकल्पाचा वेतनावर होणारा एकुण खर्च **१** कोटी **२६** लाख होता. **२०१३** पर्यंत हे प्रमाण वाढतच गेले **२०१३** मध्ये या प्रकल्पांअंतर्गत **७००** कामगार आणि **२०** अधिकारी वर्गाना रोजगार प्राप्त झाला. **२०१३** मध्ये या प्रकल्पाचा एकुण वेतनखर्च **८** कोटी **२८** लाख रूपये इतका होता. (तक्ता क्र **५.३३** पहा)

५.२.२.६ घनकचरा गांडुळखत प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे प्रमाण

तक्ता क्र ५.३४

घनकचरा गांडुळखत प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे प्रमाण

वर्शे	अधिकारीवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	कामगारवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	अधिकारीवर्गाचे वेतन(रु)(प्रतिवर्शी)	कामगार वर्गाचे वेतन(रु)(प्रतिवर्शी)	एकुण वेतन(रु) (प्रतिमहिना)	एकुण वेतनखर्च(रु) (प्रतिवर्शी)
२०१०	०१	०४	१५,०००	३२,०००	४७,०००	५,६४,०००
२०११	०२	१२	३०,०००	९६,०००	१,२६,०००	१५,१२,०००
२०१२	०२	१८	३०,०००	१,४४,०००	१,७४,०००	२०,८८,०००
२०१३	०२	२५	३०,०००	२,००,०००	२,३०,०००	२७,६०,०००
२०१४	०२	३०	३०,०००	२,४०,०००	२,७०,०००	३२,४०,०००

(संदर्भ :–प्रत्यक्ष नमुना सारणीतुन)

पुणे महानगरपालिकेअंतर्गत गांडुळखत प्रकल्प **२०१०** मध्ये सुरू झाले. **२०१०** मध्ये **२** गांडुळखत प्रकल्प व **२०११** मध्ये एक गांडुळखत प्रकल्प सुरू झाले. **३** गांडुळखत **२०१४** मध्ये पुणे महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत आहे. गांडुळखत तयार करण्यासाठी कल्चर टाकुन कचरा कुजविला जातो. गांडुळ कचरा खातात आणि त्यापासुन तयार होणारी विष्ठा म्हणजे गांडुळखत

होय. सोळा बाय चारच्या परिसरामध्ये कचरा गोळा करून गांडुळखत तयार केले जाते. २०१४ मध्ये गांडुळखत प्रकल्पाद्वारे ३० कामगार आणि २ अधिकारी वर्गाना रोजगार उपलब्ध झाला. २०१४ मध्ये गांडुळखत प्रकल्पांचा एकुण वेतनखर्च ३२ लाख ४० हजार रूपये होता.(तक्ता क्र ५.३४ पहा)

५.२.२.७ घनकचरा बायोगॅस प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

२००८ मध्ये ०४ बायोगॅस प्रकल्प पुणे महानगरपालिकेअंतर्गत चालु झाले. २०१४ पर्यंत हे प्रमाण २२ बायोगॅस प्रकल्पांपर्यत वाढले. बायोगॅस प्रक्रियेत कचरा मशीनमध्ये टाकुन लिक्वीड तयार केले जाते हे लिक्वीड गॅस टाकीत साठविले जाते. मिथेन वायू तयार करून बायोगॅस निर्माण केला जातो. २००८ मध्ये बायोगॅस प्रकल्पांचा एकुण वेतन खर्च १८ लाख रूपये होता.

तक्ता क्र ५.३५
घनकचरा बायोगॅस प्रकल्पांमध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

वर्शे	अधिकारीवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	कामगारवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	अधिकारी वर्गाचे वेतन(रु) (प्रतिमहिना)	कामगार वर्गाचे वेतन(रु) (प्रतिमहिना)	एकुण वेतन (रु) (प्रतिमहिना)	एकुण वेतनखर्च(रु) (प्रतिवर्शी)
२००८	०३	२०	३०,०००	१,२०,०००	१,५०,०००	१८,००,०००
२००९	०६	२९	६०,०००	१,७४,०००	२,३४,०००	२८,०८,०००
२०१०	११	४३	१,१०,०००	२,५८,०००	३,६८,०००	४४,१६,०००
२०११	११	४३	१,१०,०००	२,५८,०००	३,६८,०००	४४,१६,०००
२०१२	१३	५०	१,३०,०००	३,००,०००	४,३०,०००	५१,६०,०००
२०१३	१६	७४	३,३५,०००	७,३३,६००	१०,८,६००	१,२८,२३,२००
२०१४	१९	९०	३,९५,०००	८,७३,६००	१२,६८,६००	१,५२,२३,०००

(संदर्भ :–प्रत्यक्ष नमुना सारणीतुन)

२०१४ पर्यत १ कोटी ५२ लाख २३ हजार २०० रूपयापर्यत वाढलेला दिसुन येतो. रोजगाराचे प्रमाणही बायोगॅस प्रकल्पाच्या संख्येबरोबर वाढतच गेले. २०१४ मध्ये बायोगॅस प्रकल्पांअंतर्गत १९ अधिकारी आणि ९० कामगार कार्यरत होते. (तक्ता क्र ५.३५ पहा)

५.२.२.८ घनकचरा मेकॅनिकल कंपोस्ट प्रकल्पामध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

तक्ता क्र ५.३६

घनकचरा मेकॅनिकल कंपोस्ट प्रकल्पामध्ये कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे वर्गीकरण

वर्शे	अधिकारीवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	कामगारवर्गसंख्या (प्रतिवर्शी)	अधिकारी वर्गाचे वेतन(रु) (प्रतिमहिना)	कामगार वर्गाचे वेतन(रु) (प्रतिमहिना)	एकुण वेतन (रु) (प्रतिमहिना)	एकुण वेतनखर्च (रु) (प्रतिवर्शी)
२००८	०१	०६	१०,०००	४२,०००	५२,०००	६,२४,०००
२००९	०१	०६	१०,०००	४२,०००	५२,०००	६,२४,०००
२०१०	०१	०६	१०,०००	४२,०००	५२,०००	६,२४,०००
२०११	०१	०६	१०,०००	४२,०००	५२,०००	६,२४,०००
२०१२	०२	०७	३०,०००	६३,०००	९३,०००	११,१६,०००
२०१३	०३	१४	४५,०००	१,१९,०००	१,६४,०००	१९,६८,०००
२०१४	०४	१९	६५,०००	१,६९,०००	२,३४,०००	२८,०८,०००

(संदर्भ :–प्रत्यक्ष नमुना सारणीतुन)

२००८ ते २०११ पर्यत पुणे महानगरपालिकेअंतर्गत १ मेकॅनिकल कंपोस्ट प्रकल्प कार्यरत होता. मेकॅनिकल कंपोस्टींग प्रक्रियेत कचऱ्याचा भुगा करून यंत्रसामुग्रीचा वापर करून सोल्यशनद्वारे कचरा कुजविला जातो आणि खत तयार केले जाते. २०१४ मध्ये हे प्रमाण ६ प्रकल्पांपर्यत वाढले. प्रकल्पाच्या संख्येबरोबर रोजगार संधी आणि वेतनखर्चही वाढतच गेला. २००८ मध्ये १ अधिकारी आणि ६ कामगार मेकॅनिकल कंपोस्ट प्रकल्पांतर्गत कार्यरत होते. हे प्रमाण २०११ पर्यत कायम राहिले. २०११ मध्ये ०४ अधिकारी आणि १९ कामगार मेकॅनिकल कंपोस्ट प्रकल्पांतर्गत कार्यरत होते. २०१४ मध्ये मेकॅनिकल कंपोस्ट प्रकल्पांमध्ये केला जाणारा एकुण वेतनखर्च २८ लाख ८ हजार रूपये होता.(तक्ता क्र ५.३६ पहा)


५.२.२.९ घनकचरा पक्रिया प्रकल्पांची कर्जविषयक स्थितीचे वर्गीकरण

तक्ता क्र ५.३७
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची कर्जविषयक स्थिती

.अ. क्र.	कर्जविशयक माहिती	घनकचरा प्रकल्पांची संख्या	टक्केवारी
१	कर्ज घेतलेले प्रकल्प	०५	१५.१५ %
२	कर्ज न घेतलेले प्रकल्प	२८	८६.८६ %
एकुण		**३३**	**१०० %**

(संदर्भ – प्रत्यक्ष नमुना सारणीनुसार)

आलेख क्र ५.१६
घनकचरा प्रक्रिया प्रकल्पांची कर्जविषयक स्थिती



ज्या घनकचरा प्रकल्पांनी स्वतः भांडवल गुंतवणुक केलेली आहे. त्या **०५** (१५.१५%) घनकचरा प्रकल्पांनी यंत्रासामुग्री मध्ये भांडवल गुंतविण्यासाठी मोठया प्रमाणात कर्ज उभारणी केलेली आहे. त्यामुळे मिळालेल्या उत्पन्नातील बराचसा भाग त्यांना कर्जाचे हप्ते व व्याजदर

यामध्ये खर्च होतो **३३** घनकचरा प्रकल्पांपैकी **२८** घनकचरा प्रकल्प केवळ प्रोसेसिंग आहेत. त्यामुळे त्यांनी कर्ज उभारणी केलेली नाही. (तक्ता क्र **५.३७** आलेख क्र **५.१६** पहा)

५.२.२.१० घनकचरा विविध वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या प्रक्रिया प्रकल्पाचे खर्च व नफा विश्लेषण

घनकचऱ्यापासुन विविध वस्तुंचे उत्पादन करणारा प्रक्रिया प्रकल्प **२००८** मध्ये निर्माण झाला प्रक्रिया प्रकल्पासाठी जागा पुणे महानगरपालिकेने उपलब्ध करून दिली होती. यंत्रसामुग्रीची गुंतवणुक व्यावसायिकाने स्वतः केलेली होती. या प्रक्रिया प्रकल्पामध्ये

वर्षे	उत्पादितवस्तु चेनाव	वस्तुनिर्मितीचे प्रमाण (प्रतिवर्षी)	वस्तु निर्मितीचा खर्च (रु) (प्रतिवर्षी)	एकुणवेतन खर्च (प्रतिवर्षी)	इतर खर्च (रु) (घसारा ,व्याजदर, विजबिल, जाहिरात, ऑफिस इ)	वस्तुविक्रीचे उत्पन्न (रु) (प्रतिवर्षी)	म.न.पा. कडुन मिळणारी टिपिंग फी (रु) (प्रतिवर्षी)	एकुण उत्पन्न (रु) (प्रतिवर्षी)	एकुण खर्च (रु) (प्रतिवर्षी)	एकुण नफा(रु) (प्रतिवर्षी)
२००८	R.D.F.	५००० टन	२,२०,००,०००	१,२६,००,०००	४०,००,०००	४,१०,००,०००	-	४,१०,००,०००	३,८६,००,०००	२४,००,०००
	कंपोस्ट	१८००० टन								
२००९	R.D.F.	५६०० टन	२,५२,३०,०००	३,०९,६०,०००	३०,००,०००	६,२२,००,०००	-	६,२२,००,०००	५,९१,९०,०००	३०,१०,०००
	कंपोस्ट	१८००० टन								
	चरकोल	२२०० टन								
२०१०	R.D.F.	८००० टन	३,५४,००,०००	६,४४,४०,०००	३०,००,०००	१०,८०,००,०००	-	१०,८०,००,०००	१०,२८,४०,०००	५१,६०,०००
	कंपोस्ट	२०००० टन								
	चरकोल	४००० टन								
२०११	R.D.F.	७००० टन	३,९८,००,०००	७,५९,६०,०००	४०,००,०००	१५,००,००,०००	-	१५,००,००,०००	११,९७,६०,०००	०३,०२,४०,०००
	कंपोस्ट	१४००० टन								
	चरकोल	१८०० टन								
	बायोडिझेल	१०००० टन								
२०१२	R.D.F.	७५०० टन	३,६२,५०,०००	८,२८,००,०००	३०,००,०००	१४,८०,००,०००	-	१४,८०,००,०००	१२,२०,५०,०००	०२,५९,५०,०००
	कंपोस्ट	१५००० टन								
	चरकोल	२००० टन								
	बायोडिझेल	८००० टन								
२०१३	R.D.F.	७८०० टन	३,६५,५०,०००	८,२८,००,०००	४०,००,०००	१५,६५,००,०००	०२,०८,८०,०००	१७,७३,८०,०००	१२,३५,५०,०००	०५,३८,३०,०००
	कंपोस्ट	१५००० टन								
	चरकोल	२००० टन								
	बायोडिझेल	१०००० टन								

घनकचऱ्यापासुन कंपोस्ट, चारकोल, बायोडिझेल अ"ाा विविध वस्तुंचे उत्पादन केले जात होते. २०१४ मध्ये हा प्रकल्प काही कारणास्तव बंद पडला.

२००८ पासुन २०१३ पर्यत घनकचऱ्यापासुन विविध वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या प्रक्रिया प्रकल्पाच्या खर्च व नफयाचे वि"लेषण केल्यास या प्रकल्पास २००८ मध्ये २४,००,००० रु. मिळालेला नफा दरवर्षी वाढतच गेला. पुणे महानगरपालिकेबरोबर केलेल्या करारानुसार प्रकल्पाने २००८ ते २०१२ या काळात टिफिंग फी घेतली नाही. २०१३ मध्ये ५ वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर ५८ रूपये प्रतिटन घनकचरा टिंफिंग फी पुणे महानगरपालिकेतर्फे प्रकल्पास मिळाली त्यामुळे २०१३ मध्ये प्रकल्पाला मिळणाऱ्या नफयात वाढ झाली २०१३ मध्ये या प्रकल्पाअंतर्गत ७०० कामगार आणि २० अधिकारी कार्यरत होते. (तक्ता क्र ५.३८ पहा)

तक्ता क्र ५.३८
घनकचरा विविध वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या प्रक्रिया प्रकल्पाचे खर्च व नफा विश्लेषण

(संदर्भ :–प्रत्यक्ष नमुना सारणीतुन)

५.२.२.११ घनकचरा गांडुळखत प्रकल्पाचे खर्च व नफा वि"लेशण

